www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ नियम मोडणाऱ्या बेशिस्त चालकांना दाखवला वाहतूक...

पान ३ वर....


# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




■ दक्षिण कोरियातील भीषण अपघातात १७९ प्रवासी ठार

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २०५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, सोमवार, ३० डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## छतावरील सौर ऊर्जा निर्मितीत महाराष्ट्राचं काम भारी

### केंद्राकडून २६० कोटीचं बक्षीस, सूर्यघर मोफत वीज गेमचेंजर

● मुंबई, विशाल कारंडे :

**घरांच्या छतावर सौर ऊर्जानिर्मिती पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती करण्याच्या योजनेत उत्तम कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्याला गेल्या चार वर्षांत केंद्र सरकारकडून २६० कोटी ९१ लाख रुपये प्रोत्साहनपर रक्कम मिळाली आहे, असे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले. छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांना केंद्र सरकारकडून अनुदान मिळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. या योजनेत वीज ग्राहकांना थेट लाभ होत असल्याने योजनेची प्राधान्याने अंमलबजावणी करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला केली आहे. छतावरील सौर ऊर्जानिर्मितीच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी महावितरणला जबाबदारी देण्यात आली आहे.**

छतावरील सौर ऊर्जा निर्मितीच्या बाबतीत किती घरांवर प्रकल्प बसविले व त्यातून त्यांची वीजनिर्मिती क्षमता किती झाली याबाबतीत केंद्र सरकारकडून प्रत्येक राज्याच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाते. आधीच्या वर्षापेक्षा चालू वर्षात किती जास्त कामगिरी झाली यानुसार केंद्र सरकार त्या त्या वीज वितरण कंपनीला यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रोत्साहनपर रक्कम मंजूर करते. महाराष्ट्र राज्याला छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यातील कामगिरीबद्दल केंद्र सरकारकडून २०१९– २० व २०२०-२१ या दोन आर्थिक वर्षात अनुक्रमे ५९ व ३७ कोटी रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्यात आली. २०२१-२२ या आर्थिक वर्षात राज्याची कामगिरी उंचावल्यामुळे केंद्र सरकारकडून ६९ कोटी ४७ लाख रुपये प्रोत्साहनपर रक्कम मंजूर झाली. २०२२–२३ या आर्थिक वर्षासाठी ९४ कोटी ९१ लाख रुपये मंजूर झाले. २०२३– २४ या आर्थिक वर्षात आधीच्या वर्षापेक्षा अधिक चांगली कामगिरी झाल्यामुळे केंद्र सरकारच्या निकषानुसार १३७ कोटी रुपये प्रोत्साहनपर रक्कम मिळणे अपेक्षित आहे.



### सूर्यघर मोफत योजनेसाठी

राज्यामध्ये आतापर्यंत २,३७,६५६वीज ग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविले असून त्यांची एकूण क्षमता २७३८ मेगावॅट आहे. त्यामध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या ८१,९३८ ग्राहकांचा व त्यांच्या एकूण ३२३ मेगावॅट क्षमतेचा समावेश आहे. या ग्राहकांना ६४७ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घरावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या घरगुती ग्राहकांना केंद्र सरकारकडून थेट अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट क्षमतेसाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. महावितरणने या योजनेत घरगुती वीज वापरासाठी सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसविणाऱ्या ग्राहकांना मोफत नेट मिटर देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी https://www.pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करता येते.



## जम्मू-काश्मीरमध्ये यावर्षी ७५ दहशतवाद्यांचा खात्मा

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

जम्मू आणि काश्मीरमध्ये वर्षभरात ७५ दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. चकमकीत ठार झालेले ६० टक्के दहशतवादी पाकिस्तानी नागरिक होते, अशी माहिती लष्कराच्या सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटनांमध्ये केवळ चार स्थानिक तरुण सहभागी झाल्याचेही लष्कराने स्पष्ट केले आहे. या वर्षी जम्मू-काश्मीरमध्ये वेगवेगळया चकमकीत आणि शोध मोहिमेत सुमारे ७५ दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात यशस्वी झाली आहे. पाकिस्तानने गेल्या वर्षभरापासून जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादाला खतपाणी घालण्याचा प्रयत्न केला आहे, जम्मू प्रदेशातील राजौरी, पूंछ, डोडा, किश्तवार, कठुआ आणि रियासी या जिल्ह्यांसह या भागात पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या कारवायांना अतिरिक्त जवान तैनात करत न आळा घालण्यात आला आहे.

### दर पाच दिवसांनी एका दहशतवाद्याचा खात्मा

अर्थ भारतीय सुरक्षा दल दर पाच दिवसांनी एका दहशतवाद्याचा खात्मा करत आहेत. आतापर्यंत मारल्या गेलेल्या ७५ पैकी बहुतांश विदेशी दहशतवादी होते. यामध्ये नियंत्रण रेषा (एलओसी) आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर (आयबी) घुसखोरीचा प्रयत्न करताना १७ दहशतवादी मारले गेले. तर चकमकीत २६ दहशतवादी ठार झाले आहेत. वाढत्या दहशतवादी धोक्याला आळा घालण्यासाठी सुरक्षा दलांच्या कारवाया महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत.

### ⟮⟯ थोडक्यात ⟮⟯



### ठाण्याचे पहिले महापौर सतीश प्रधान यांचे निधन

ठाणे : शिवसेना नेते तसेच ठाणे महानगरपालिकेचे प्रथम नगराध्यक्ष, त्याच सोबत ठाणे महापालिकेचे प्रथम महापौर सतीश प्रधान यांचे निधन झाले आहे. दुपारी २ च्या सुमारास सतीश प्रधान यांचे वृद्धपकाळाने निधन झाले आहे. शिवसेना पक्षाच्या जडणघडणीत त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. सतीश प्रधान यांचे दुपारी दोन वाजता निधन झाले असून सोमवारी सकाळी १० वाजता त्यांच्या निवसस्थानावरून अंत्ययात्रा काढण्यात येणार आहे.

### चिनी मालवाहू जहाजाच्या धडकेत मासेमारी नौका बुडाली, जीवितहानी नाही



मालाड : मालाड पश्चिमेतील मढकोळीवाळातील ग्रामस्थ हेमदीप हरिश्चंद्र टिपरी यांच्या मासेमारी नौकेला खोल समुद्रात चिनी मालवाहू जहाजाने धडक दिली. दिनांक २८ डिसेंबर रोजी रात्री १२ ते १२.३० वाजण्याच्या सुमारास धडक मारल्याने नौका बुडाली. सुदैवाने या नौकेवरील तांडेल, खलाशी सुखरूप आहेत. घटनेच्यावेळी बाजुला असलेल्या सवटी ग्रुपच्या नौकांनी या नौकेवरील लोकांना वाचवले. तसेच सवटी ग्रुपच्या आठ बोटीने नौका बांधून बुडालेल्या नौकेला किनाऱ्यावर घेऊन मढ, तलपशा बंदरात पोहोचवले. त्याबरोबर घटनेची माहिती मिळताच कोस्ट गार्ड, नेव्हीचे पथक ही मदतीला सोबत आल्याची माहिती किरण कोळी सरचिटणीस, महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती यांच्याकडून मिळाली.

## मनुष्य प्राणी महत्वाचा की कुत्रे मांजरी ?


● ठाणे, रोहित जैसवाल :



मनुष्य प्राणी महत्त्वाचा की, भटके कुत्रे, भटके मांजर महत्त्वाचे ? असा सवाल खासदार नरेश म्हस्के यांनी विचारला असुन हा विषय केंद्रीय स्तरावर निश्चित करणे गरजेचे आहे. तसेच या विषयाला चालना देण्याचा प्रयत्न करत असल्याचे मत व्यक्त केले. ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशन व सहकार विभागाने आयोजित केलेल्या गृहनिर्माण संस्थांच्या महाअधिवेशनात सोसायटीतील पाळीव प्राण्यांविषयी नियमावली बनवण्याचा ठराव सर्वसहमतीने मांडण्यात आला. त्यावर खा. म्हस्के यांनी वरील भाष्य केले.

पान २ वर

## बालिकेच्या हत्याप्रकरणात ॲड. उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीसाठी सरकार प्रयत्न करणार



● नवी मुंबई, धनश्री सट्टा :

नवी मुंबईतील अशाच एका पीडित महिलेच्या प्रकरणात ॲड. निकम यांनी न्यायालयात महत्वाची भूमिका बजावली होती. त्याप्रमाणे कल्याणमधील बालिकेच्या अत्याचार/हत्या प्रकरणात ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांनी सरकारतर्फे न्यायालयात बाजू मांडावी यासाठी आपण स्वत: शासन स्तरावर प्रयत्न करणार आहे. हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालविण्यासाठी ॲड. निकम यांची शासनाने तातडीने नियुक्ती करावी यासाठी आपण आग्रही असणार आहोत, अशी माहिती राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी शनिवारी कल्याणात प्रसार माध्यमांशी संवाद साधताना दिली.बालिकेच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी वनमंत्री गणेश नाईक शनिवारी कल्याणमध्ये आले होते. त्यानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. बालिकेचे कुटुंब अद्यापही दहशतीच्या छायेखाली असल्याची माहिती मिळाली. अद्याप या भागात कुणाची तरी दहशत आहे. त्यांची या कुटुंबीयांना भीती आहे, अशी माहिती मिळाल्याने या कुटुंबीयांना दिलासा देण्यासाठी आणि शासन आपल्या पाठीशी ठाम आहोत, हे सांगण्यासाठी आपण पीडित कुटुंबीयांना भेटण्यासाठी आल्याचे वनमंत्री नाईक यांनी सांगितले. या प्रकरणातील गुन्हेगाराला कायद्याच्या चौकटीतून कठोरात कठोर शिक्षा होईल, त्यासाठी शासन सर्वोतपरी प्रयत्न करणार आहे. सरकार पक्षातर्फे न्यायालयात बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांची नेमणूक करण्यात यावी, यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.

पान २ वर

## माथेरानच्या क्रीडा संकुलाची दयनीय अवस्था ! क्रीडाप्रेमींमध्ये तीव्र नाराजी



● माथेरान, धनश्री सट्टा :

जिल्ह्यातील सर्वात मोठे क्रीडा मैदान म्हणून माथेरानचे वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुल ( ऑलिंपिया मैदान) हे प्रसिद्ध मैदान असून या मैदानावर जानेवारी पासून मार्च महिन्यापर्यंत टेनिस बॉल क्रिकेट सामने आयोजित करण्यात येतात.तर मे महिन्यात अश्व शर्यतीचे आयोजन करण्यात येते. क्रिकेटचे सामने पाहण्यासाठी इथे प्रेक्षकांची मोठया प्रमाणावर गर्दी असते. जवळपास पंचवीस एकरांमध्ये ह्या मैदानाची व्याप्ती असून गावापासून दूरवर हे मैदान आहे. याच मैदानाच्या सुशोभीकरण आणि दुरुस्तीसाठी मागील काळात जवळजवळ पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु अयोग्य नियोजनामुळे ह्या मैदानाच्या विकास कामांचा पुरता बोजवारा उडाला आहे. स्टेडियम मधील शेडचे पत्रे गायब झालेले असून उन्हाळयात प्रेक्षकांना झाडांचा आधार घ्यावा लागत आहे.

पान २ वर

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ एप्रिल २०२५ मध्ये होणार सुरू..!

● पनवेल, भावना जैन :



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज (रविवार) पहिले व्यवसायीक इंडिगो ए-३२० विमान दुपारी दीड वाजता यशस्वी लँडिंग झाले. विमान लँडिंग झाल्यानंतर विमानाला पाण्याची सलामी देत उपस्थित विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी एकमेकांना शुभेच्छा देत आनंद व्यक्त केला. १७ एप्रिल २०२५ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होणार असल्याची माहिती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमान प्रधिकरणाचे सी ई ओ यांनी दिली. १७ एप्रिल रोजी डोमेस्टिक प्रवासी आणि कार्गो पार्सल सेवा सुरू होणार आणि जुलै २०२५ मध्ये इंटरनॅशनल प्रवासी सेवा सुरू होइल अशी माहिती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानप्रधिकरणाचे सी ई ओ यांनी दिली.

पान २ वर

### ‘आई’सारखे दैवत साऱ्या जगतावर नाही

## मातोश्रींच्या पार्थिवावर नाना पटोले ढसाढसा रडले



● नागपूर, नितीन देवळेकर :

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आई मीराबाई फाल्गुनराव पटोले यांचं वयाच्या ९२व्या वर्षी आज पहाटे नागपूर इथं वृद्धापकाळानं निधन झालं. त्यांच्यावर भंडाऱ्याच्या सुकळी या स्वगावी चुलबंद नदीच्या तीरावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या आईचं अंतिम दर्शन घेताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे डोळे पाणावल्याचे दिसून आले. नाना पटोले यांनी पाणावलेल्या डोळयांनी त्यांच्या आईला अखेरचा निरोप दिला. यावेळी नाना पटोले यांचे मोठे बंधू विनोद पटोले आणि पटोले कुटुंबासह उपस्थितांचेही डोळे पानावल्याचं चित्र बघायला मिळाला.

पान २ वर

## बीडमधील फरार आरोपींच्या मालमत्ता जप्त करा!

● मुंबई, विशाल पाटील :



“बीडमधील संतोष देशमुख हत्याकांडातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करा,” असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘सीआयडी’च्या अतिरिक्त महासंचालकांना दिले आहेत. त्याचबरोबर बंदुकीसोबत ज्यांचे-ज्यांचे फोटो आहेत, ते जर खरे असतील, तर त्या सर्वांचे परवाने रद्द करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करा, असे निर्देश बीड पोलीस अधीक्षकांना देताना, तातडीने फेरआढावा घेण्याच्या सूचनाही केल्या आहेत. बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावाजवळ आवाडा कंपनीचा ‘पवन ऊर्जा प्रकल्प’ असून, त्यांच्याकडून दोन कोटी रुपये खंडणी मागण्यात आली होती. त्यावरून वाद आणि हाणामारी झाली.यावेळी मार खालेल्या आरोपींनी संतोष देशमुख यांना गाठून त्यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली. या प्रकरणातील आरोपींना अटक करावी, या मागणीसाठी शनिवार, दि. २८ डिसेंबर रोजी बीड जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चामध्ये विविध पक्ष आणि संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

दरम्यान, बीडमधील सर्वपक्षीय मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) आमदार प्रकाश सोळंकेही सहभागी झाले. संतोष देशमुख प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत आणि आरोपीला फाशीची शिक्षा होत नाही तोपर्यंत धनंजय मुंडे यांचे मंत्रिपद काढून घ्यावे, अशी मागणी त्यांनी केली. शनिवारी सकाळी ११ वाजता बीडच्या डॉ. आंबेडकर चौकातून या सर्वपक्षीय मोर्चाला सुरुवात झाली. माळीवेस, अण्णा भाऊ साठे चौक, बस स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून पोलीस अधीक्षक कार्यालयापर्यंत तो पोहोचला. मोर्चामध्ये स्थानिक खा. बजरंग सोनवणे, सुरेश धस, जितेंद्र आव्हाड, संभाजीराजे छत्रपती, भाजपचे आमदार अभिमन्यू पवार आणि मराठा आंदोलक मनोज जरांगेसह अनेक नेत्यांनी सहभाग घेतला.

पान २ वर

## संपादकीय

# ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना

भारतात अनेक स्थानिक स्वराज्य संस्था या अजूनही प्राथ प्राथमिक कृषी पतसंस्था, दुग्धालये आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांसारख्या सुविधांपासून वंचित आहेत. खरे तर पतपुरवठा, निविष्ठा, बाजारपेठा तसेच रोजगार उपलब्ध करून देण्यात या प्राथमिक स्तरावरील सहकारी संस्थांची भूमिका खूपच महत्त्वाची असते. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने याची दखल घेतली आणि सरकारने ग्रामपंचायतींमध्ये नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषी पतसंस्था, दुग्धालये आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था स्थापन करण्याच्या योजनेला मंजुरी दिली आहे.

या योजनेअंतर्गत आजवर या सुविधांपासून वंचित असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये त्या उभारल्या जाणार आहे. त्यामुळे बहुउद्देशीय प्राथमिक कृषी पतसंस्था या ग्रामीण भागातील विकासाचा आधारस्तंभ बनू शकणार आहेत. त्यामुळेच या योजनेअंतर्गत प्रत्येक गावात किमान एक सहकारी पतसंस्था, सहकारी दुग्धालय, आणि मत्स्य सहकारी संस्था असायला हवी, असे उद्दिष्ट समोर ठेवले गेले आहे. सरकारच्या या उपक्रमाअंतर्गत दुग्धालये, मत्स्यव्यवसाय आणि इतर क्षेत्रांमध्ये पत पुरवठ्याची उपलब्धता आणि व्यवसायाच्या संधी वाढवण्यावर भर दिला गेला आहे. स्वाभाविकपणे ग्रामीण भागातली रोजगाराची उपलब्धता आणि ग्रामीण क्षेत्राच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत या सगळ्याचे महत्त्वाचे योगदान असणार आहे.

या योजनेअंतर्गत देशातील प्रत्येक गाव आणि पंचायतींमध्ये या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २ लाख नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था स्थापन केल्या जाणार आहेत. दोन कलमी कृती आराखड्यासह ही योजना राबवली जात आहे- १. पुढच्या पाच वर्षांत सर्व पंचायती आणि गावांमध्ये नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था, सहकारी दुग्धालये आणि मत्स्य सहकारी संस्थांची स्थापना करणे. २. सध्या अस्तित्वात असलेल्या सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करणे. ही योजना यशस्वी करण्यासाठी पुढच्या पाच वर्षांत ७० हजार नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था, ५६ हजार नवीन बहुउद्देशीय दुग्ध सहकारी संस्था आणि ६ हजार नव्या बहुउद्देशीय मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था स्थापन करून सध्या अस्तित्वात असलेल्या सहकारी संस्थाचे सक्षमीकरण करण्याचे उद्दिष्ट सरकारने समोर ठेवले आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने एक मार्गदर्शिकाही प्रकाशित केली आहे. या पुस्तिकेच्या माध्यमातून बहुउद्देशीय प्राथमिक कृषी पतसंस्थांसाठी आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचना आणि मार्गदर्शक तत्त्वांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना या योजनेची सुनियोजित पद्धतीने अंमलबजवणी करण्याच्या दृष्टीने सक्षम केले असल्याचे निश्चितच म्हणता येईल. या सोबतच बहुउद्देशीय प्राथमिक कृषी पतसंस्थांच्या निर्मिती प्रक्रियेत राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक, राष्ट्रीय मत्स्यव्यवसाय विकास मंडळ, राष्ट्रीय मत्स्य विकास मंडळ यांसारख्या अंमलबजावणी भागीदार संस्था देखील सक्रिय सहभाग देत आहेत.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे दुधोत्पादन प्रक्रिया आणि पायाभूत सोयी सुविधा विकास निधी, राष्ट्रीय दुग्धालय विकास कार्यक्रम आणि पंतप्रधान मत्स्य संपदा योजना या आणि अशाप्रकारच्या भारत सरकारच्या योजनांचे एकात्मिकरण घडवून आणणे हादेखील या योजनेच्या अंमलबजावणीशी जोडलेला एक महत्त्वाचा पैलू आहे. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केल्याने कालबद्ध रितीने समतोल विकासाची स्थिती गाठणे सुलभ झाले आहे.

त्या अनुषंगानेच या योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने प्रभावी समन्वय राखता यावा यासाठी उच्चस्तरीय ते कनिष्ठ स्तरीय अशा प्रवाही स्वरूपाचा दृष्टिकोन बाळगत राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हास्तरीय समित्यांसह आंतरमंत्रालय समित्यांची स्थापना केली गेली आहे. या सोबतच या योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रियेची केंद्रीय सहकार मंत्रालय नियमित देखरेख करत असून, आवश्यक तिथे पाठबळही पुरवत आहे.

सहकारविषयक राष्ट्रीय माहिती साठ्यानुसार सद्यस्थितीत देशभरात १०,४५८ इतक्या नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषी पतसंस्था, एमपीएसीची नोंदणी झाली आहे. बहुउद्देशीय दुग्धालय सहकारी संस्था, बहुउद्देशीय मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आणि बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था स्थापन केल्यामुळे ग्रामीण परिसंस्था विकासाच्या प्रवाहात येईल आणि मोठ्या संधीही उपलब्ध होऊ शकतील. महत्त्वाचे म्हणजे यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत लघु आणि अल्पभूधारक शेतकरी, वंचित आणि दुर्बल घटकांचा सहभागही वाढू शकणार आहे.

## आजची चित्रोळी




डोंगरातले पाझर सगळे  
नदी होऊनी वाहातात !  
डोंगर खांद्यावरी खेळतां  
शुभ्रपणानें हांसतात !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांचा आज जन्मदिन. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट साबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले.



राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला. "बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता....." आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है.... we all miss you.....

राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार , पुणे**

# पत्राचाळीत म्हाडाची २६ मजली व्यावसायिक इमारत



**मुंबई (राकेश गायकवाड):** गोरेगाव पश्चिम येथील सिद्धार्थनगर अर्थात पत्राचाळीच्या पुनर्विकासाअंत पत्राचाळीत म्हाडाची २६ मजली व्यावसायिक इमारत र्गत म्हाडाच्या मुंबई मंडळाला नऊ भूखंड विकासासाठी उपलब्ध झाले आहेत. त्या नऊपैकी चार भूखंडांवर २,३९४ घरे बांधली जाणार आहेत. मात्र आता मंडळाने उपलब्ध भूखंडांपैकी आर-५ भूखंडावर अनिवासी बांधकाम करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार या भूखंडावर २६ मजली व्यावसायिक इमारत बांधली जाणार असून त्यातील गाळ्यांची विक्री भविष्यात ई लिलाव पद्धतीने केली जाणार आहे. यासंबंधीचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्यासह या प्रकल्पाचे नियोजन करण्याचे काम सध्या मंडळाकडून सुरू आहे. वादग्रस्त पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प म्हाडाच्या मुंबई मंडळाकडे वर्ग झाल्यानंतर मंडळाने अर्धवट अवस्थेतील पुनर्वसित इमारतींसह म्हाडाच्या हिश्श्यातील ३०६ घरांचा समावेश असलेल्या इमारतीच्या कामाला सुरुवात केली. त्या दोन्ही इमारतींची कामे पूर्ण झाली असून आता केवळ निवासी दाखल्याची प्रतीक्षा आहे. उपलब्ध भूखंडावर अधिकाधिक गृहनिर्मिती करण्याचे म्हाडाने ठरवले असतानाच आता आर-५ भूखंडावर व्यावसायिक इमारत बांधण्याचा विचार पुढे आला. त्यानुसार निर्णय घेत प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू असल्याची माहिती म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

म्हाडा अभिन्यासाच्या पुनर्विकासाअंतर्गत अर्थात ३३ (५) अंतर्गत पुनर्विकास करताना विकासासाठी उपलब्ध क्षेत्राच्या ६० क्षेत्रात अत्यल्प, अल्प आणि मध्यम गटांसाठी गृहनिर्मिती करणे बंधनकारक आहे. तर उर्वरित ४० टक्के क्षेत्रात उच्च गटासाठी घरे बांधण्यासह व्यावसायिक इमारती बांधण्याची मुभा आहे. त्यानुसार विकासासाठी उपलब्ध जागेच्या ८ टक्के जागेचा वापर व्यावसायिक बांधकामासाठी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या हा प्रकल्प अगदी प्राथमिक स्तरावर आहे. त्यामुळे तो नेमका कसा असेल हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल असेही त्यांनी सांगितले. एकूणच आता गोरेगावमध्ये म्हाडाकडून व्यावसायिक इमारत उभारत यातील गाळे विक्रीसाठी भविष्यात उपलब्ध करून दिले जाणार आहेत.



# टोमॅटो, फ्लॉवर, कोबी, शेवगा, पावट्याच्या दरात घट

**पुणे (अभिजीत येरल्लू) :** मार्केट यार्डातील घाऊक बाजारात आवक वाढल्याने टोमॅटो, फ्लॉवर, कोबी, शेवगा, पावट्याच्या दरात घट झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ते १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून १० ते १२ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून प्रत्येकी ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटकातून घेवडा आणि पावटा प्रत्येकी ५ ते ६ टेम्पो, आंध्र प्रदेश, तमिळनाडूतून मिळून ५ टेम्पो शेवगा, राजस्थानातून १० टेम्पो गाजर, मध्य प्रदेशातून १८ ते २० ट्रक मटार, तामिळनाडूतून १ टेम्पो तोतापुरी कैरी, मध्य प्रदेशातून ७ ते ८ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.

## पान १ वरून...

### बीडमधील फरार आरोपींच्या मालमत्ता जप्त...

अभिनेत्री प्राजक्ता माळीची सुरेश धसांविरोधात महिला आयोगाकडे धाव

बीडमधील संतोष देशमुख हत्याकांडाविषयी भाष्य करीत असताना, आमदार सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळीचे नाव घेतल्यामुळे त्यांच्याविरोधात महिला आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. “त्यांनी माझी जाहीर माफी मागावी,” अशी मागणी प्राजक्त माळी हीने केली आहे. मुंबई मराठी पत्रकार संघात शनिवार, दि. २८ डिसेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने आमदार सुरेश धस यांच्या वक्तव्याचा निषेध नोंदवला. ती म्हणाली, “गेल्या दीड महिन्यांपासून हे सुरू आहे. पण, हतबलता म्हणून मी शांत बसले. लोकप्रतिनिधी आपल्यावर चिखलफेक करतात, तेव्हा बोलणे गरजेचे आहे. राजकारणात महिला कलाकरांना का खेचता? बीडमध्ये कधी पुरुष कलाकार गेले नाहीत का? तुम्ही केवळ महिलांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवत नाहीत, तर त्यांच्या कर्तृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहात. यातून तुमची मानसिकता दिसते. सुरेश धस यांनी माझी जाहीर माफी मागावी. माझीच नाही, तर इतर अभिनेत्रींचीही त्यांनी नावे घेतली असून त्यांचीही माफी मागावी. धस यांनी माफी न मागितल्यास कायदेशी कारवाईला सामोरे जावे,” असा इशाराही तिने दिला आहे.”

प्रसार माध्यमांसमोर कसे बोलावे, हे त्यांनी शिकून घेतले पाहिजे. अशा लोकांमुळे आमचे कलाक्षेत्र बदमान होत आहे. करुणाताई मुंडे यांना मिळलेली माहिती चुकीची आहे. महिला आयोगाकडे त्यांचीही तक्रार केली आहे. पण, त्यानंतर त्या गप्प होत्या, म्हणून मी नंतर शांत होते. याप्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना भेटून निवेदन देणार, असल्याचे प्राजक्ता माळीने स्पष्ट केले.

### मातोश्रींच्या पार्थिवावर...

अभिनेत्री अंत्यविधीसाठी नाना पटोले यांचे राजकीय हाडवैर असलेले भाजप नेते आमदार परिणय फुके, नाना पटोले यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक लढणारे भाजपचे अविनाश ब्राह्मणकर यांच्यासह सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ता आणि पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विजय वडेट्टीवार यांनी वाहिली श्रद्धांजली

दरम्यान, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मीराबाई पटोले यांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांनी ‘एक्स’वर पोस्ट शेअर करून म्हटले आहे की, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, आमदार नाना पटोले यांच्या आई मीराबाई पटोले यांचे आज वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. या कठीण प्रसंगी मी आणि माझे संपूर्ण कुटुंब पटोले कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहोत. ईश्वरचरणी प्रार्थना आहे की नाना पटोले आणि त्यांच्या परिवाराला या दुःखातून सावरण्याचे बळ मिळावे.

तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी देखील मीराबाई पटोले यांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांनी म्हटलंय की, काँग्रेस पक्षातील आमचे सहकारी, प्रांताध्यक्ष नाना पटोले यांच्या मातोश्री मीराबाई फाल्गुनराव पटोले यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. आम्ही सर्व पटोले कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत.

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ एप्रिल...

यापुर्वी ११ ऑक्टोबर रोजी सी २९५ हे भारतीय वायुदलाचे विमान गांधीनगरहून तर सुखोई ३० हे पुण्यातून आले व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले होते. सी २९५ विमान एअरक्राफ्टची लँडिंग आणि सुखोई ३० एअरक्राफ्टची चाचणी तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि आताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले होते.

### माथेरानच्या क्रीडा संकुलाची दयनीय...

तर दूरवरून क्रिकेट सामने पाहताना सुध्दा ज्या जांभ्या दगडांचा अनाठायी वापर करून एकप्रकारे ह्या मैदानाला बकालपणा आणलेला असल्याने हे मैदान पूर्णपणे विद्रुप झालेले दिसत आहे. निदान प्रेक्षकांना उन्हापासून बचाव करण्यासाठी स्टेडियम वर पत्रे लावण्यात यावेत जेणेकरून कुणालाही उन्हाच्या झळांना सामोरे जावे लागणार नाही.प्रेक्षकांना क्रिकेट सामने पाहताना मनसोक्तपणे आनंद घेता येईल यासाठी संबंधित खात्याने याबाबत ठोस उपाययोजना करावी अशी समस्त क्रीडाप्रेमीं मधून मागणी केली जात आहे.

### मनुष्य प्राणी महत्वाचा की कुत्रे मांजरी ?

ठाण्यातील उपवन तलाव परिसरात आयोजित केलेल्या गृहनिर्माण संस्थाच्या तीन दिवसीय महाअधिवेशन आणि प्रदर्शनाला दुसऱ्या दिवशी हजारोंच्या संख्येने गृहनिर्माण संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.या महाअधिवेशनात ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे यांनी सोसायट्याना नेहमी सतावणाऱ्या पाळीव प्राण्यांचा मुद्दा ऐरणीवर आणला. अधिवेशनात पाळीव प्राण्यांविषयी बोलायचे असेल तर सर्वोच्च न्यायालयाची गाइडलाईन पाळण्याचे निर्देश ठाणे मनपाने दिले. अनेक प्राणीमित्रांनी तर उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे दाखले पाठवत कायद्यावर बोट ठेवल्याचे सांगितले. पाळीव प्राणी बाळगण्या बाबत अन्य रहिवाशी त्रस्त आहेत. पाळीव प्राण्यांच्या त्रासाबाबतच्या तक्रारी वाढत आहेत.

पाळीव प्राण्याचे पालक आणि तक्रारदार रहिवाश्यामध्ये यावरून नेहमीच खटके उडतात. तक्रार करायला गेल्यास पोलीस तक्रारदारालाच गुन्हेगार समजतात. पाळीव प्राण्यांबाबत आमच्या मनात कोणतीही अढी नाही, परंतू त्यांचा त्रास सर्वांना होत आहे. त्यामुळे सोसायटीत पाळीव प्राणी पाळण्याविषयाची नियमावली कायद्यात असायला हवी. प्राणी पाळण्याबाबतचा परवाना घेणे हा महापालिकेचा नियम आहे. परंतू, याकडे प्राणीप्रेमी दूर्लक्ष करताना दिसून येतात, याकडे सीताराम राणे यांनी लक्ष वेधले.यावर अधिवेशनात संबोधित करताना खा. नरेश म्हस्के यांनी, मनुष्य प्राणी महत्त्वाचा की, भटके कुत्रे, मांजर महत्त्वाचे ? असा सवाल करून हा विषय केंद्रीय स्तरावर निश्चित करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

ठाणे महापालिका क्षेत्रातील ५० पेक्षा अधिक सदनिका असलेल्या गृहसंकुलांनी अधिकृत पेस्ट कंट्रोल एजन्सी नेमून डास अळीनाशक औषधांची फवारणी करून त्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या प्रशासनाच्या फतव्याला गृहनिर्माण संस्थांनी विरोध दर्शवला आहे. पालिका सर्व प्रकारचे कर आकारते. मग हा फवारणीचा खर्च सोसायटयांच्या माथी का ? असा सवाल करून हौसिंग फेडरेशनच्या सीताराम राणे यांनी, गुन्हे दाखल झाले तरी बेहत्तर कुणीही हा खर्च करायची गरज नाही. असे स्पष्ट करीत महापालिकेच्या कारवाईला देखील सामोरे जाण्याची तयारी दर्शिवली. या ठरावास खासदार नरेश म्हस्के,आमदार संजय केळकर यांनीही पाठिंबा दर्शविला.

### बालिकेच्या हत्याप्रकरणात अ‍ॅड. उज्ज्वल...

तसेच आपण स्वत: यासंदर्भात अ‍ॅड. उज्वल निकम यांच्याशी बोलणार असल्याचेही वनमंत्री नाईक यांनी सांगितले.

बालिकेची हत्या करणाऱ्या गुन्हेगाराला अशी काही शिक्षा होईल की समाजात पुन्हा असे कृत्य करण्यासाठी धजावणार नाही. हा समाजात संदेश जाण्यासाठी या प्रकरणातील गुन्हेगाराच्या कठोरातील कठोर शिक्षेसाठी शासन प्रयत्नशील राहणार आहे. समाजात अशा कृत्यांसाठी कुणी दहशत माजवून कुटुंबीयांना त्रास देत असेल तर त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शासन तत्पर आहे. त्यामुळे कुणीही अशा दहशतीला घाबरू नये. पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासात कोणत्याही त्रूटी ठेऊ नये. हे प्रकरण लवकरात लवकर जलदगती न्यायालयात चालवून हत्या प्रकरणातील गुन्हेगाराला कठोर शिक्षा होईल यासाठी शासन प्रयत्नशील असेल, असे वनमंत्री नाईक यांनी सांगितले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www. lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# जिल्हास्तरीय लोकशाही दिन ६ जानेवारी रोजी

**पालघर :** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याच्या पहिल्या सोमवारी करण्यात येते. त्या अनुषंगाने जानेवारी २०२५ चा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि. ०६ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ०१:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित करण्यात येणार आहे. तरी अर्ज केलेल्या नागरिकांनी लोकशाही दिन रोजी आवश्यक त्या माहितीसह प्रत्यक्ष वरील दिनांकास व वेळेवर उपस्थित रहावे.

# टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**तलासरी :** मुंबई - वडोदरा द्रुतगती महामार्गाचे काम करणाऱ्या रोडवेज सोल्युशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या ठेकेदार कंपनीच्या डिझेल टँकरने दुचाकीला धडक दिल्याने १९ वर्षीय दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला तर एकजण गंभीर जखमी झाला आहे. कोचाई ग्रामपंचायत हद्दीत शनिवारी दीड वजताच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. महेश दशरथ सालकर, वय १९ वर्ष असे मृत तरुणाचे नाव आहे. तर अरुण शैलेश वरठा असे जखमी तरुणाचे नाव असून ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की महेश सालकर आणि अरुण वरठा हे दोघे तरुण मोटारसायकल वरून घरी परतत असताना कोचाई बोरमाळा रस्त्यावर वडीपाडा येथे भीषण अपघात घडला. द्रुतगती महामार्गाच्या काम करणाऱ्या इतर वाहनांना डिझेल पुरवणाऱ्या रोडवेज कंपनीच्या टँकरने ( एम एच ११सी एच ४४२८) जोरदार धडक दिल्याने बाईक स्वार तरुण गंभीर जखमी झाले या अपघातात महेश सालकर याचा डोक्याला जबर मार बसल्याने जागीच मृत्यू झाला. परंतु ग्रामस्थांचा माहितीनुसार कर्तव्यावर असलेले सहा. पोलिस निरीक्षक हेमंत देवरे यांनी सदर दोन्ही जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्याऐवजी घरी पाठवल्याने पोलिसांवर संशय व्यक्त केला जात आहे. अपघातानंतर एकाचा जागीच मृत्यू झाला असताना पोलिसांनी दोन्ही जखमींना रुग्णालयात दाखल करणे आवश्यक होते. मात्र तसे न होता मयत तरुणाचा मृतदेह घरी नेण्यात आल्याने पोलिसांनी सदर प्रकरण परस्पर दडपणाच्या प्रयत्न केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे . प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचे पाहून स्थानिक आक्रमक झाले होते यानंतर पोलिसांनी वेगळी भूमिका घेत घरी नेलेला मृत्यदेह पुन्हा रुग्णवाहिका मागवून ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. आक्रमक ग्रामस्थांनी काम बंद करून रोडवेज कंपनीवर कारवाई होत नाही आणि मयत आणि जखमी कुटुंबाला मदत दिली जात नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका पोलिसांसमोर मांडली आहे. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# डोंबिवलीत स्मार्ट सहेली उपक्रम सुरु

**डोंबिवली :** अबला महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांमुळे एकीकडे पोलिसांकडून महिलांच्या सुरक्षेसाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरल्या जात आहेत. तर दुसरीकडे लोकल वा लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्येही प्रवासी महिला असुरक्षित नसल्याच्या घटना घडत आहेत. रेल्वे सुरक्षा बलाने पुढाकार घेऊन डोंबिवलीत स्मार्ट सहेली उपक्रम सुरू केला आहे. स्वतःच्या वा सहप्रवासी असलेल्यांच्या सुरक्षेसाठी तातडीची मदत मिळविण्यासाठी १३९ क्रमांकाचा वापर करावा, असे रेल्वे सुरक्षा बलाकडून महिला प्रवाशांना आवाहन करण्यात आले आहे. मध्य रेल्वे मार्गावरील सुरक्षा बलाच्या अंतर्गत असलेल्या डोंबिवली रेल्वे सुरक्षा बलाचे वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.२८) स्मार्ट सहेली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात डोंबिवलीच्या ग्रुप अॅडमिन शिवानी, ठाकुर्लीच्या ग्रुप अॅडमिन कामिनी आणि कोपरच्या ग्रुप अॅडमिन संध्या यांचे स्मार्ट सहेली ग्रुप कंट्रोलिंग ऑफिसर पिंकी आणि सुरेखा यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. या सर्व महिलांना सुरक्षा बलाचे महिला शिपायांनी सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. महिलांना काही अडचण वा संकट आल्यास त्यांना तातडीने मदत मिळविण्यासाठी रेल्वे सुरक्षा बलाच्या १३९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या ग्रुप अॅडमिननी आपापल्या समस्या रेल्वे सुरक्षा बलाच्या वरिष्ठांपुढे कथन केल्या.

# नियम मोडणाऱ्या बेशिस्त चालकांना दाखवला वाहतूक पोलिसांचा इंगा

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** एकीकडे रस्ते अपघातांत वाढ होत चालली असून वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस आणि शासनाकडून वारंवार आवाहन केले जाते. परंतु त्यानंतरही बेशिस्त वाहन चालक मंडळी काही केल्या ऐकायचे नाव घेत नसल्याने अखेर वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर डोंबिवली शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतुकीचे नियम वाहन चालकांसह नागरिकांच्या सुरक्षेकरिता बनविले आहेत. मात्र अनेक चालक नियमांचे पालन करत नसल्याने ते स्वतःसह इतरांचाही




जीव धोक्यात घालत असतात. अशा चालकांना वठणीवर आणण्यासाठी कारवायांचा बडगा उगारण्यात येतो. सुशिक्षितांच्या सांस्कृतिक नगरीत नियम आणि कायद्यांची पायमल्ली करणाऱ्यांच्या विरोधात शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्रीराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने शनिवारी (दि.२८) रोजी रात्रीपासून कारवाईची झोड घेतली आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतूक पोलिसांकडून वाहन चालकांवर होत असलेली कारवाई पाहून अनेक रिक्षावाल्यांनी घाबरून पळ काढला. मात्र आपल्यावरही कारवाई होऊ शकते, याची जाणीव झालेले दुचाकी व चारचाकीचे चालक वाहतूक नियमांचे पालन करताना आढळून आले.

मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांमुळे अपघात हमखास होऊ शकतात. त्यामुळे वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी २५ डिसेंबरपासून मंगळवारच्या (दि.३१) थर्टी फर्स्टनंतर अगदी पहाटेपर्यंत ब्रेथ अॅनालायझरचा वापर सुरू केला आहे. मद्यपान वा कोणतेही नशापान करून वाहन चालवताना कुणी तावडीत सापडलाच तर त्याची गय केली जाणार नसल्याचा इशारा वपोनि श्रीराम पाटील यांनी या पार्श्वभूमीवर बोलताना दिला. शनिवारी (दि.२८) रोजी संध्याकाळनंतर रात्री उशिरापर्यंत बेशिस्त चालकांवर ब्रेथ अॅनालायझरचा वापर केला. अनेक रिक्षावाल्यांनी त्यांच्या रिक्षांना चुकीच्या पद्धतीने हेडलाईट लावलेले आढळून आले. चुकीच्या पद्धतीने हेडलाईट लावण्याने समोरील चालक अथवा रस्ता ओलाडणाऱ्यांचा अपघात होऊ शकतो. अशा हेडलाईट लावणाऱ्या रिक्षाचालकांवरही कारवाई करण्यात आल्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांनी सांगितले.

# ११ महिन्यांत ४० किलो ड्रग्जसह ११ कोटींचा मुद्देमाल जप्त

**खानिवडे (सतीश सोनावणे) :** मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने गेल्या ११ महिन्यांत ३२ प्रकरणांमध्ये ४० किलो ड्रग्ज जप्त केले असून ११ कोटी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणांत आतापर्यंत ६२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यातील अनेक आरोपी गुजरात, मध्यप्रदेश आणि बिहार येथील रहिवाशी आहेत.

आकडेवारीनुसार आयुक्तालयाचा परिसर मादक पदार्थांच्या विळख्यात सापडल्याचे दिसून येते. हे दाखल असलेल्या प्रकारणांवरील आकडेवारी असून दाखल होणाऱ्या केसेसच्या तुलनेत दाखल न होणारी प्रकरणे किती असतील असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.



पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मिरा-भाईंदर आणि वसई विरार उपनगरांना ड्रग्ज साठवणूक व वितरणासाठी लक्ष्य केले जात असल्याची माहिती आहे. अँटी नॉर्कोटिक्स सेलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, अटक करण्यात आलेल्यापैकी बहुतांश आरोपी स्थानिक असून काही गुजरात, मध्यप्रदेश आणि बिहार येथून आले आहेत. नेपाळमार्गे बिहार आणि देशभर ड्रग्जचे वितरण केले जात आहे.

दरम्यान मिरा-भाईंदर आणि वसई-विरार उपनगरात येणारे उच्च मूल्य असलेली ड्रग्ज, चरस, गांजा हे नेपाळमार्गे बिहारातून भारतात आणली जातात आणि देशभर वितरित केली जातात. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जमध्ये एमडी (मेफेड्रोन), चरस, कोकेन, हेरॉईन आणि गांजाचा समावेश आहे.

यासंदर्भात मुंबईतून पाच आरोपींना अटक करून ३ किलो चरस जप्त करण्यात आले, जे नेपाळमार्गे बिहारातून आणण्यात आले होते. त्याशिवाय मध्यप्रदेशातील तीन आरोपींना चरससह अटक करण्यात आली होती. तसेच ठाणे आणि गुजरात येथून दोन आरोपींना अटक करण्यात आली, ज्यांच्याकडून १,४०० बाटल्या कोरेक्स कफ सिरप जप्त करण्यात आले होते.

# रात्री मोकाट फिरणाऱ्या १७० झिंगाडांवर कारवाईचा फास



**डोंबिवली (सम्यक कासारे) :** तरूणी, महिलांसह निरागस बालिकांवर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनांना आळा बसावा यासाठी पोलिसांनी नशिल्या पदार्थांच्या आहारी गेलेल्या नशेडींना वठणीवर आणण्यासाठी कारवायांची झोड उठवली आहे. कल्याण परिमंडळ ३ चे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे यांनी तर लागोपाठ चौथ्या दिवशी अर्थात शनिवारी रात्री सार्वजनिक ठिकाणी नशा करणाऱ्या तब्बल १७० नशेडींच्या विरोधात दारूबंदी अधीनियमासह फौजदारीच्या ७ कायद्यांचा वापर करून या साऱ्यांची झिंग उतरवली आहे.कल्याण पोलिस परिमंडळ ३च्या हद्दीत कल्याणातील बाजारपेठ, खडकपाडा, कोळसेवाडी, महात्मा फुले चौक, तर डोंबिवलीतील रामनगर, विष्णूनगर, टिळकनगर आणि मानपाडा अशी एकूण 8 पोलिस ठाणी आहेत. कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या १२ वर्षीय बालिकेच्या अपहरण, अत्याचार आणि खूनानंतर पोलिस अॅक्शन मोडवर आले आहेत.

# नाशिक मुंबई महामार्गावर अपघात, अपघातात दोघे जखमी




**ठाणे (सम्यक कासारे) -** येथील कॅडबरी सिग्नल जवळ, नाशिक-मुंबई महामार्गावरून सिन्नरहून मुंबईकडे जात असलेल्या सिमेंट मिक्सर टँकरची ट्रकला जोरदार धडक बसून अपघात झाल्याचा प्रकार रविवारी उघडकीस आला आहे. या अपघातात दोन जण जखमी झाले आहेत. याप्रकरणी राबोडी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे.

संदिप यादव हे रविवारी नाशिक – मुंबई महामार्गावरुन सिन्नर हून मुंबईच्या दिशेकडे प्रवास करत असताना, त्यांचा मिक्सर टँकर कॅडबरी सिग्नलजवळ येताच तांत्रिक बिघाडामुळे बंद पडला. त्याचवेळी मुकेश यादव (३०) आणि त्याचा मदतनीस पंकज (२५) हे दोघे मिक्सर टँकर घेऊन ओवळा माजिवडा हून मुलुंडकडे प्रवास करत होते. कॅडबरी सिग्नलजवळ येताच मुकेश याचा वाहनावरील नियंत्रण सुटले आणि त्याची धडक बंदावस्थेत उभ्या असलेल्या मिक्सत टँकरला बसली. या अपघातात मुकेश यादव (३०) आणि पंकज (२५) हे दोघे गंभिररित्या जखमी झाले आहेत. त्यांच्यावर जवळील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

# विमा कंपन्यांनी पैसे थकवल्याने शहापूर तालुक्यातील शेतकरी हवालदील

**शहापूर (रोहित जैसवाल) :** प्रतीवर्षी पीकविमा हप्ता भरूनही शेतकरी मात्र पीक विम्यापासून वंचित राहतो आहे. पीकविम्याचे पैसे घेऊन पीक विमा कंपन्या मात्र मालामाल होत आहेत. तर दुसरीकडे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खराब होत चालली आहे. त्यामुळे पीक विमा भरूनही शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे येईनात, अशी म्हणण्याची वेळ आली आहे.

लवकरात लवकर पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावेत, अशी मागणी शहापूर तालुक्यातील शेतकरी करीत आहेतअवकाळी पावसाने किंवा हवामानातील बदलामुळे शेतकऱ्यांच्या आबां पिकासह अन्य




पिकाचे मोठे नुकसान झाले. त्यांचे पंचनामे होऊन चार महिने उलटून गेले, तरी अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर एच.डी एफ.सी. ॲग्रो इन्शुरन्स या पीकविमा कंपन्यांकडून पैसे जमा होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी दिसत आहे. शेतकरी पीक विमा भरत असतानाही शहापूर तालुक्याला सातत्याने डावलण्यात आले आहे. वास्तविक, नैसर्गिक आपत्तीच्या वेळेला शेतकऱ्यांसाठी संरक्षण कवच म्हणून विमा कंपन्यांचा उल्लेख होतो. मात्र, त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. शेतकऱ्यांना पीक विमा मिळेल, अशा घोषणा केल्या होत्या. मात्र, त्या घोषणा हवेतच विरल्या गेल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. दरम्यान विमा कंपनी बोलते शासनाकडून आम्हाला अद्याप पैसे मिळाले नाहीत तर शासन म्हणते पैसे पाठवले तर मग शेतकऱ्यांचा खात्यात विलंब का? असा प्रश्न उपस्थित केला असून विमाधारक शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित विमा रक्कम जमा करावी, यासाठी शहापूर तालुक्यातील आंबा उत्पादक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कृषीाधिकारी, तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

# हुतात्मा वीर भाई कोतवाल पुण्यतिथीसाठी मुरबाडचा सिद्धगड सज्ज

**ठाणे (रोहित जैसवाल) :** भारतीय स्वातंत्र्याचा अजरामर इतिहास हा प्रामुख्याने अनेक स्वातंत्र्य सैनिक आणि क्रांतिकारकांच्या बलिदानाने,त्यागाने तथा प्रणांच्या आहुतीने लिहिला गेला आहे.राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या १९४२ च्या चलेजाव आंदोलना नंतर स्वातंत्र्याच्या क्रांतीची खरी चळवळ देशभर उभी राहू लागली होती. देशभक्तीने प्रेरित होऊ देशाच्या विविध भागात भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी तरुण तरुणी स्वतःहून पुढे येऊ लागले होते. क्रांतीच्या ज्योतीचा वणवा हळूहळू उग्ररुप धारण करू लागला होता.याच दरम्यान रायगड जिल्ह्यातील माथेरान मधील नाभिक समाजाचे सुपुत्र ऍडव्होकेट विठ्ठलराव उर्फ भाई कोतवाल आपल्या सहकाऱ्यांसह क्रांतीच्या आंदोलनात सामील झाले होते.

महात्मा गांधींच्या भारत छोडो आंदोलनानंतर भाईंनी स्वतःला स्वातंत्र्याच्या आंदोलनात पूर्णपणे झोकून दिले होते.''एकतर स्वातंत्र्य, नाहीतर स्वर्ग'' या ज्वलंत विचाराने प्रेरित झालेल्या भाई कोतवालांनी हिराजी पाटील यांच्या साथीने आझाद दस्ताच्या माध्यमातून ब्रिटिश राजवटीला सळो की पळो करून सोडले होते.शेवटी हतबल होऊन ब्रिटिश सरकारने भाई कोतवालांच्या अटकेसाठी इनाम लावला होता. अखेर फितुरीच्या विळख्यात सापडून जुलमी ब्रिटिश राजवटीशी लढताना दि.२ जानेवारी १९४३ रोजी वीर भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांस वीर मरण आले.भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या महान शुर वीरांना अभिवादन करून श्रद्धांजली अर्पित करण्यासाठी सिद्धगड येथे दरवर्षी १ व २ जानेवारी रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.या वर्षीदेखील या थोर हुतात्म्यांच्या ८२ व्या बलिदान दिनानिमित्त सिद्धगड स्मारक समितीच्या वतीने अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले असल्याची माहिती सिद्धगड स्मारक समितीचे अध्यक्ष मा.आमदार गोटिराम



भाऊ पवार यांनी दिली. बुधवार दि.१जानेवारी रोजी संध्याकाळी ६ वाजल्यापासून वकृत्व, समुहगान स्पर्धा व विविध देशभक्ती पर कार्यक्रम रात्रभर होणार आहेत.दुसऱ्या दिवशी २ जानेवारी सकाळी ६ वाजून १० मिनिटांनी हुतात्मा ज्योत प्रज्वलित करून हुतात्म्यांना अभिवादन करून मानवंदना दिली जाणार आहे.यानंतर ठीक आठ वाजता भव्य कुस्ती स्पर्धा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी नवनिर्वाचित वन मंत्री गणेश नाईक,माजी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील,भिवंडीचे लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे,मुरबाडचे आमदार सुरेश कथोरे,सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव,सिद्धगड स्मारक समितीचे अध्यक्ष माजी आमदार गोटीराम भाऊ पवार,ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुरेश पवार यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी,

ठाणे,रायगड,पालघर,पुणे आणि अहिल्यानगर सह महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील शेकडो देशप्रेमी नागरिक व लोकप्रतिनिधी तसेच शाळा कॉलेजचे विद्यार्थी तथा राज्यभरातील नाभिक समाज हुतात्म्यांना मानवंदना देण्यासाठी सिद्ध गडावर उपस्थित राहणार आहे.२जानेवारीला सकाळी ठीक सहा वाजून दहा मिनिटांनी हुतात्मा ज्योत प्रज्वलित झाल्यानंतर पोलीस दलाकडून हुतात्म्यांना सलामी दिली जाते.

वकृत्व स्पर्धेसाठी इयत्ता पहिली ते चौथी साठी वीर हुतात्मा भाई कोतवाल व वीर हिराजी पाटील या दोन पैकी एक तर इयत्ता पाचवी ते सातवी करीता आझाद दस्त्याचे शिलेदार किंवा क्रांतिवीर गोमाजी पाटील या दोन पैकी एक. आठवी ते दहावी साठी सिद्धगड एक अविस्मरणीय लढा किंवा सिद्धगड स्मारक स्मृती व परंपरा या दोन पैकी एक.तसेच खुल्या गटासाठी सिद्धगड लढ्यातून आम्ही काय शिकावे किंवा कोतवाल गटाच्या क्रांतिकार्याची वैशिष्टे या दोन पैकी एका विषयावर भाषण करायचे आहे. समुहगान स्पर्धा देखील याचप्रमाणे चार गटांत होणार आहेत.या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी योगेंद्र बंगर ९३२६०५८३८३,यशवंत माळी ७०२०२७९५१०,एकनाथ देसले ९२२६८७६७९८,महेंद्र पवार ८३६९१७१५०५ यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन स्मारक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान माथेरान येथे देखील अशाच प्रकारच्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून हुतात्मा भाई कोतवाल चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शन एकनाथ देसले यांचे 'सिद्धगडचा रणसंग्राम' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

# उघड्यावरील अन्न खाल्ल्याने ५ मुलांना विष बाधा

**उरण (भावना जैन) -** दिघोडे बस स्थानका जवळील उघड्यावर विकला जाणारा सुरमा हा खाद्यपदार्थ मूलांनी खाल्याने ५ जणांना विषबाधा झाल्याची घटना शनिवारी ( दि२९) घडली आहे. त्यामुळे सदर मुलांच्या पोटात दुखायला लागले व उलट्या होऊ लागल्याने त्यांना तातडीने चिरनेर गावातील रवि क्लिनिक या रुग्णालयात दाखल करण्यात आले असता रुग्णालयातील डॉक्टर प्रकाश मेहता यांनी सदर मूलांवर उपचार सुरू केले.सदरची विष बाधा ही सुरमा हा खाद्यपदार्थ खाल्याने झाला असल्याची माहिती सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.अन्न व औषध प्रशासनाने पैशाच्या हव्यासापोटी उरण तालुक्याकडे दुर्लक्ष केल्याने आज शहरात व तालुक्यातील अनेक गावातील नाक्यांवर राजरोसपणे उघड्यावरील खाद्यपदार्थ परप्रांतीय नागरीक विक्री करत आहेत. त्यामुळे उघड्यावरील अन्न खाल्ल्याने अनेकांना उलट्या,पोटात दुखण्याची कारणे समोर येत आहेत.त्यातच शनिवारी ( दि२९) दिघोडे बस स्थानका जवळील रस्त्यावर विकला जाणारा सुरमा हा खाद्यपदार्थ शुभम पाटील,शुभम ठाकूर,निशांत भगत,रोहन पाटील व एक लहान मुलगा यांनी खाल्ल्याने त्यांना पोटात दुखायला लागले तसेच उलट्या होऊ लागल्याने त्यांना तातडीने चिरनेर गावातील रवि क्लिनिक रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले.रुग्णालयातील डॉ प्रकाश मेहता यांनी सदर रुग्णांवर उपचार सुरू



केले.परंतु आज डॉ प्रकाश मेहता यांच्या तत्परतेने सदर रुग्णांचे प्राण वाचले आहे.तरी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी नागरीकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या उघड्यावरील विक्री करणाऱ्या अशा व्यवसायिकांवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.सदर रुग्णांनी उघड्यावरील सुरमा हा अन्न पदार्थ खाल्ल्याने त्यांना फुड पॅंयजन ( अन्नातून विषबाधा) झाले आहे.त्याची प्रकूती चांगली आहे.तरी नागरीकांनी विशेष करून लहान मुलांनी उघड्यावरील अन्न पदार्थ खाऊ नयेत.

# सलमान खानचा ५९ वा वाढदिवस जामनगरमध्ये जल्लोषात साजरा



अभिनेता सलमान खानने आता ५९व्या वयात पदार्पण केलं आहे. २७ डिसेंबरला सलमानचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यादिवशी मुंबईत भाईजानने आपल्या कुटुंबियांबरोबर वाढदिवस साजरा केला. अभिनेत्याच्या वाढदिवशी भाची आयतचा वाढदिवस असतो. त्यामुळे सलमान २७ डिसेंबरला आयतबरोबर केक कापताना दिसला. याचा फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला होता. त्यानंतर खान कुटुंबासह अनेक सेलिब्रिटी सलमानचा वाढदिवस साजरा करण्यासाठी जामनगरला रवाना झाले.

देशातील सर्वात मोठे उद्योगपतींपैकी एक असलेल्या अंबानी कुटुंबाने सलमान खानच्या ५९व्या वाढदिवसाची पार्टी जामनगरमध्ये आयोजित केली होती. सलमानचा वाढदिवस अंबानी कुटुंबाने मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला. स्वतः मुकेश अंबानी आणि नीता अंबानी या पार्टीला उपस्थित होते. जामनगरमधील पार्टीतला एक व्हिडीओ सध्या खूप व्हायरल झाला आहे.

अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते अतुल अग्निहोत्री यांनी सलमान खानच्या वाढदिवसाच्या पार्टीचा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. यामध्ये भाईजान भाची आयतसह केक कापताना दिसत आहे. यावेळी एकाबाजूला खान कुटुंबासह इतर सेलिब्रिटी पाहायला मिळत आहेत. तर दुसऱ्या बाजूला मुकेश अंबानी आणि नीता अंबानी टाळ्या वाजवत सलमानला शुभेच्छा देताना दिसत आहेत. त्यानंतर फटाक्यांची आतिषबाजी पाहायला मिळत आहे. जामनगरमध्ये सलमान खानच्या वाढदिवसाची पार्टी जल्लोषात झाली आहे. या पार्टीला खान कुटुंबासह अभिनेता रितेश देशमुख, जिनिलीया डिसूजा-देशमुख, निर्माता साजिद नाडियाडवाला जामनगरमध्ये पाहायला मिळाले.

दरम्यान, सलमान खानच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, सध्या त्याचा आगामी चित्रपट 'सिकंदर'ची चर्चा आहे. वाढदिवसाचं औचित्य साधून २८ डिसेंबरला या चित्रपटाचा धमाकेदार टीझर प्रदर्शित झाला. 'सिकंदर' चित्रपटाचं दिग्दर्शन एआर मुरुगार्दास करत आहेत. या चित्रपटात सलमान खानसह रश्मिका मंदाना, सुनील शेट्टी आणि काजल अग्रवाल प्रमुख भूमिकेत पाहायला मिळणार आहे.

# नवीन वर्षाच्या मुहूर्तावर 'लक्ष्मीच्या पाऊलांनी' फेम अभिनेत्याचं व्यवसाय क्षेत्रात पदार्पण



मराठी सिनेसृष्टीतील अनेक कलाकार मंडळी आपल्या अभिनय क्षेत्रातील कामासह स्वतःचा व्यवसाय करत आहेत. २०२४मध्ये अनेक कलाकारांनी व्यवसाय क्षेत्रात पदार्पण केलं. अभिनेत्री मृणाल दुसानिस, अनुष्का पिंपुटकर, मेघन जाधव, सई ताम्हणकर, रेश्मा शिंदे, अक्षया देवधर, अपूर्वा गोरे, तेजस्विनी पंडित, प्रसाद लिमिये, महेश जाधव अशा अनेक कलाकारांनी व्यवसाय क्षेत्रात पाऊल ठेवलं. आता या यादीमध्ये आणखी एका अभिनेत्याचं नाव सामिल झालं आहे. नवीन वर्षाच्या मुहूर्तावर 'लक्ष्मीच्या पाऊलांनी' या लोकप्रिय मालिकेतील अभिनेत्याने स्वतःचं रेस्टॉरंट सुरू केलं आहे.'स्टार प्रवाह' वाहिनीवरील सध्याच्या लोकप्रिय मालिकांपैकी एक म्हणजे 'लक्ष्मीच्या पाऊलांनी'. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात सुरू झालेल्या या मालिकेने अल्पावधीतचं प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केलं. अभिनेत्री ईशा केसकर, अक्षर कोठारी, किशोरी अंबिये, दिपाली पानसरे, मंजुषा गोडसे, मिलिंद ओक असे तगडे कलाकार मंडळी 'लक्ष्मीच्या पाऊलांनी' मालिकेत पाहायला मिळत आहेत. मालिकेत ईशाने साकारलेली कला आणि अक्षरने साकारलेला अद्वैत प्रेक्षकांच्या चांगलेच पसंतीस उतरले आहेत. कला-अद्वैतची जोडी घराघरात पोहोचली आहे. इतर कलाकारांनीही प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यापैकी एक म्हणजे अभिनेता ऋत्विक तळवलकर.अभिनेता ऋत्विक तळवलकरने 'लक्ष्मीच्या पाऊलांनी' मालिकेत सोहम चांदेकरची भूमिका साकारली आहे. याच सोहम म्हणजे ऋत्विकने नवीन वर्षांच्या मुहूर्तावर स्वतः;चं रेस्टॉरंट सुरू करून व्यवसाय क्षेत्रात पाऊल ठेवलं आहे. यासंदर्भात त्याने व्हिडीओ शेअर केला आहे.

व्हिडीओत ऋत्विक तळवलकर म्हणाला, "हॅलो... नमस्कार मंडळी...आज मी हा व्हिडीओ अत्यंत आनंदाची बातमी देण्यासाठी बनवतं आहे. तर काही दिवसांआधी मी सर्वांना सांगितलं होतं की, मी ऑनलाइन रेस्टॉरंट म्हणजेच क्लाउट किचन सुरू करतोय. 'द मिसळ कॅंटीन' असं त्याचं नाव आहे. २९ डिसेंबरपासून वसंत विहार, ठाण्यामध्ये माझं क्लाउट किचन सुरू झालं आहे. तुम्ही झोमॅटोद्वारे ऑडर करू शकता. तसंच वसंत विहारमध्ये राहत असाल तर घरपोच डिलिव्हरी होऊ शकते. या कॅंटीनमध्ये मिसळसह असंख्य मराठी पदार्थ तुम्हाला मिळतील. तर तुम्ही सगळ्यांनी नक्की आस्वाद घ्या."

ऋत्विक तळवलकरचा हा व्हिडीओ अनेक कलाकारांनी इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला आहे. अभिनेत्री साक्षी गांधी, ध्रुव दातार, ऋतुजा कुलकर्णी, देविका मांजरेकर अशा अनेक कलाकारांसह चाहत्यांनी ऋत्विकला त्याच्या नव्या व्यवसायासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बॉयफ्रेंडसोबत कुलदेवतेचं दर्शन करुन अंकिता वालावलकरने दाखवली लग्नाची पत्रिका





कोकण हार्टेड गर्ल अशी ओळख असणारी बिग बॉस फेम अंकिता वालावलकर सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत असते. अंकिताने बिग बॉस मराठीचा पाचवा सीझन चांगलाच गाजवला. अंकिता सध्या सोशल मीडियावर तिच्या लग्नासंबंधी चांगलीच सक्रीय आहे. अंकिता आणि तिचा नवरा कुणाल भगत लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. अंकिताने लग्नाआधी तिची पत्रिका कुलदेवतेला दाखवली आहे. अंकिता-कुणालच्या लग्नाचा खास फोटो सोशल मीडियावर व्हायरल झालाय.

अंकिता-कुणालच्या लग्नाची सध्या चांगलीच चर्चा आहे. अंकिताने सोशल मीडियावर एक फोटो शेअर केलाय. या फोटोत अंकिताने तिच्या लग्नपत्रिकेचा फोटो तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केलाय. केळीच्या हिरव्या पानाचं डिझाईन असलेली ही पत्रिका लोकांच्या पसंतीस उतरली आहे. पहिली पत्रिका कुलदेवतेला आणि आजोळच्या देवीला #कोकणी परंपरा असं कॅप्शन देऊन अंकिताने लग्नाची पत्रिका शेअर केलीय.

अंकिता वालावलकरने बिग बॉसमध्ये असताना तिने तिच्या बॉयफ्रेंडबद्दल खुलासा केला होता. पण बॉयफ्रेंड कोण हे सांगितलं नव्हतं. शेवटी बिग बॉसमधून बाहेर आल्यावर अंकिताने तिच्या बॉयफ्रेंडचा खुलासा केला. कुणाल भगत असं अंकिताच्या बॉयफ्रेंडचं असून तो एक गायक-संगीतकार आहे. अंकिता - कुणाल जानेवारीच्या अखेरीस किंवा फेब्रुवारी २०२५ मध्ये लग्न करणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## चर्चा खूप तरीही सिनेमा फ्लॉप?

# वरुण धवनच्या 'बेबी जॉन'ने चार दिवसांत कमावले अवघे इतके कोटी



'बेबी जॉन' सिनेमाची गेले वर्षभर खूप चर्चा होती. २०२३ मध्ये शाहरुख खानचा 'जवान' सिनेमा आलेला तेव्हाच 'बेबी जॉन'चा पहिला टीझर सर्वांच्या भेटीला आला. त्यानंतर या वर्षात 'बेबी जॉन' विषयी अनेक ठिकाणी बोललं गेले. सिनेमाची गाणी अन् ट्रेलरचीही चांगलीच चर्चा झाली. सिनेमा ख्रिसमसच्या मुहुर्तावर २५ डिसेंबरला रिलीज झाला. 'बेबी जॉन'ची चार दिवसांची कमाई समोर आली असून वरुण धवनचा हा सिनेमा फ्लॉप झाल्याचं दिसतंय. ख्रिसमसच्या मुहुर्तावर रिलीज झालेल्या 'बेबी जॉन'कडे प्रेक्षकांनी पाठ फिरवलेली दिसून आली. सैकनिल्कने दिलेल्या आकड्यांनुसार 'बेबी जॉन'ने पहिल्या दिवशी ११.२५ कोटींची कमाई केली.


# ना पुष्पा, ना बाहुबली; शोले आहे भारतात सर्वाधिक पाहिली गेलेली फिल्म



सध्या संपूर्ण भारतात 'पुष्पा 2: द रूल'चं वारं आहे. सगळीकडे फक्त पुष्पाचीच चर्चा आहे. एवढंच काय तर, पुष्पाच्या कमाईच्या आकडूयांनी तर सर्व चित्रपटांचे रेकॉर्ड मोडले आहेत. अल्लू अर्जुनच्या चित्रपटाची कमाई १५०० कोटींच्या पुढे गेली आहे. पण, आज आम्ही तुम्हाला भारतातील सर्वाधिक पाहिल्या गेलेल्या चित्रपटाबाबत सांगणार आहोत. ज्याचं नाव ऐकून तुम्हाला विश्वास बसणार नाही. या चित्रपटाचं नाव आहे, 'शोले'. देशातील सिनेप्रेमींना हा चित्रपट विसरणं अशक्य आहे.

धर्मेंद्र, अमिताभ बच्चन, हेमा मालिनी, जया बच्चन आणि संजीव कुमार स्टारर चित्रपट शोले रमेश सिप्पी यांनी दिग्दर्शित केला होता. १९७५ मध्ये प्रदर्शित झालेल्या शोलेची २५ कोटी तिकिटं विकली गेली होती आणि भारतीय सिनेमाच्या सर्वाधिक पाहिल्या गेलेल्या चित्रपटांच्या यादीत त्याचा आजही आवर्जुन समावेश केला जातो. १५ ऑगस्ट १९७५ रोजी प्रदर्शित झालेल्या शोले चित्रपटाला पुढील वर्षी (२०२५) सहा दशकं पूर्ण होतील, पण चित्रपटातील प्रत्येक दृश्य, संवाद, गाणं आणि त्यातील लोकप्रिय पात्रं आजही लोकांच्या मनात जिवंत आहेत. सुरुवातीला या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर फारसा प्रतिसाद मिळाला नाही आणि समीक्षकांनीही चित्रपटावर टीका केली होती, पण चित्रपटातील अविस्मरणीय पात्रं आणि त्यातील संवादांमुळे प्रेक्षकांना चित्रपटगृहात जाण्यास भाग पाडलं. यातील गब्बरच्या 'कितने आदमी है' या डायलॉगनं प्रेक्षकांना आकर्षित केलं. शोले सहा वर्ष थिएटरमध्ये चालला आणि भारतात १५ कोटी तिकिटं विकली गेली. तसेच, शोलेच्या पुन्हा रिलीजच्या वेळी भारतात ३ कोटी तिकिटं विकली गेली होती. जर आपण जगभरात पाहिलं तर, शोले सर्वाधिक पाहिला गेला तो, रशियामध्ये. जिथे चित्रपटाची ६ कोटी तिकिटं विकली गेली. याशिवाय युरोप, उत्तर अमेरिका आणि मध्य पूर्व या देशांमध्ये शोलेची प्रचंड क्रेझ होती आणि एकूणच या चित्रपटाची २५ कोटी तिकिटं विकली गेली. बाहुबली २ आणि RRR सारखे मेगा-ब्लॉकबस्टर चित्रपट देखील शोलेच्या तिकीट विक्रीचा विक्रम मोडू शकले नाहीत. अमिताभ बच्चन यांनी साकारलेला जय, धर्मेंद्र यांनी साकारलेला वीरू, संजीव कुमार यांनी साकारलेला ठाकूर, अमजद खान यांनी साकारलेला गब्बर, हेमा मालिनी यांनी साकारलेली बसंती आणि जया बच्चन यांनी साकारलेली राधाची भूमिका, रुपरी पडद्यावर अजरामर झाल्या.

# 'मुफासा'ची एन्ट्री लवकरच होणार १०० कोटींच्या क्लबमध्ये




'मुफासा: द लायन किंग'ची चर्चा संपूर्ण जगभर सुरु आहे. या चित्रपटाने कमाईच्या बाबतीत देशभरातील अनेक चित्रपटांना मागे टाकले आहे, तर जगभरातील कलेक्शनबद्दल बोलायचे झाल्यास हा चित्रपट भारतातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला असून 'पुष्पा 2' साठी हा चित्रपट उत्तम स्पर्धक आहे. मात्र, 'मुफासा'सोबतच हिंदी, तमिळ आणि मल्याळम चित्रपटही प्रदर्शित झाले, ज्यांच्याकडून लोकांना खूप अपेक्षा होत्या. पण नवव्या दिवशीही मुफासा सर्वाधिक कमाई करत आहे.

२० डिसेंबर रोजी 'मुफासा: द लायन किंग', 'विदुथलाई २', 'मार्को', 'वनवास' आणि UI थिएटरमध्ये प्रदर्शित झाले. हे सर्व चित्रपट वेगवेगळ्या जॉनरचे आहेत. या सर्व चित्रपटांपैकी काही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली, पण काही चित्रपट फ्लॉप ठरले, त्यात नाना पाटेकर यांच्या 'वनवास'चा समावेश आहे. साऊथमध्येही 'मुफासा'ची भुरळ लोकांना पडली आहे, तर निर्मात्यांना साऊथ स्टार विजय सेतुपतीच्या 'विदुथलाई 2' कडून खूप आशा होत्या. वॉल्ड डिस्नेच्या मुफासा या चित्रपटाविषयी सांगायचे तर, या चित्रपटाच्या हिंदी आवृत्तीत शाहरुख खान आणि त्याच्या दोन मुलांनी आवाज दिला आहे.

# कुकिंग करताना तेजस्वी प्रकाशचा हात जळाला



बॉलिवुडचं विश्व मोठं रंजक आहे. या क्षेत्रात रोज नवनवीन घडामोडी घडतात. अनेक दिग्गज कलाकार इथं नवनवे प्रयोग करत असतात. छोट्या पडद्यावरील कलाकृतींवर प्रेम करणाराही मोठा चाहतावर्ग आहे. सध्या सेलिब्रिटी मास्टरशेफ हा कार्यक्रम चांगलाच चर्चेत आहे. या कार्यक्रमात सिनेसृष्टीतील मोठे चेहरे वेगवेगळे खाद्यपदार्थ तयार करतात. मात्र याच कार्यक्रमात भाग घेतलेला असताना अभिनेत्री तेजस्वी प्रकाश जखमी झाली आहे. खाद्यपदार्थ तयार करत असताना तिचा हात जळला आहे.

तेजस्वी प्रकाशचा संपूर्ण महाराष्ट्र तसेच देसभरात मोठा चाहतावर्ग आहे. तिने टीव्हीवर साकारलेल्या भूमिकांमुळे तिच्यावर लाखो लोक प्रेम करतात. याआधी तेजस्वी प्रकाश बिग बॉस या रियालिटी शो तसेच नागीण यासारख्या मालिकांत दिसलेली आहे. त्यानंतर आता ही अभिनेत्री सेलिब्रिटी मास्टरशेफ या कार्यक्रमात दिसणार आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमाचे शूटिंग पूर्ण झालेले आहे. मात्र या कार्यक्रमाच्या शूटिंगदरम्यान तेजस्वीचा हात भाजला आहे.खुद्द तेजस्वीनेच याबाबत माहिती दिली आहे.

शनिवारी तेजस्वी प्रकाश सेलिब्रिटी मास्टरशेफच्या सेटवर दिसली. यावेळी तिने ब्लू टॉप आणि ग्रे जॉगर परिधान केले होते. शूटिंग संपल्यानंतर तिने पापाराझींना फोटोसाठी पोज दिल्या. यावेळी बोलताना तिने तिचा हात जळाल्याचं सांगितलं. खाद्यपदार्थ तयार करताना ही जखम झाल्याचं तिने सांगितलं आहे. ओव्हनमुळे तिचा हात भाजल्याचं तिनं म्हटलं आहे. यावेळी तेजस्वीने हाताला क्रिम लावल्याचंही दाखवलं. तेजस्वी प्रकाशने आतापर्यंत अनेक मोठ्या चित्रपटांत काम केलेलं आहे.

सेलिब्रिटी मास्टरशेफ या कार्यक्रमात तेजस्वी प्रकाशसोबतच अर्जना गौतमही झळकणार आहे. या कार्यक्रमात दीपिका कक्कड़ इब्राहिम, गौरव खन्ना, राजीव अदातिया, निक्की तंबोळी, फेसल मलिक, उषा नाडकर्णी, कबिता सिंह असे दिग्गज सेलिब्रिटी दिसणार आहे.

## राशी भविष्य




**मेष** – आजचा दिवस मिश्र फलदायी आहे. आज उक्ती व कृती ह्यावर संयम ठेवणे तसेच राग द्वेषापासून दूर राहणे हितावह राहील.

**वृषभ** – आज संसारात व दांपत्य जीवनात सुख - शांती अनुभवाल. कुटुंबीय व निकटचे मित्र यांच्या सह उत्तम भोजनाचा आस्वाद घ्याल.

**मिथुन** – आज आपली अपूर्ण कामे पूर्ण होतील. त्यात मनासारखे यश मिळेल. घरातील शांती व समाधानाचे वातावरण मनाला प्रसन्न ठेवेल.

**कर्क** – आजच्या दिवसाची सुरूवात चिंता व उद्वेगाने होईल. नवे काम सुरू करण्यासाठी आजचा दिवस अनुकूल नाही. अचानक धन खर्च होईल.

**सिंह** – आजचा दिवस प्रतिकूलतेचा आहे. घरात वाद होतील. कुटुंबात अशी एखादी घटना घडेल की त्यामुळे आपणास दुःख होईल.

**कन्या** – आज कोणत्याही कार्यात विचारपूर्वकच सहभागी व्हावे. बरोबरीच्या लोकांमध्ये वेळ चांगला जाईल. भावनात्मक संबंधातून हळवे व्हाल.

**तुळ** – आज आपली मनःस्थिती द्विधा झाल्याने आपण कोणत्याही बाबतीत ठाम निर्णय करू शकणार नाही.

**वृश्चिक** – आजचा दिवस साधारणच आहे. तन - मनाला सुख - आनंद मिळेल. कुटुंबियांसह उत्साहात व आनंदात वेळ घालवाल.

**धनु** – आजचा दिवस कष्टदायी आहे. कुटुंबियांशी मतभेदाचे प्रसंग उदभवतील. स्वभावात रागीटपणा येऊन वाद होतील.

**मकर** – आज विविध क्षेत्रातून लाभ होण्याचा दिवस असल्याने सामाजिक कार्यातून लाभ होईल. मित्र व स्नेही यांच्या भेटीतून लाभ होईल.

**कुंभ** – आजचा दिवस अनुकूलतेचा आहे. आज आपले प्रत्येक काम सहजपणे पार पडेल. त्यामुळे आनंदी राहाल.

**मीन** – मनातील दुःख व अशांतता ह्याने आजच्या दिवसाची सुरुवात होईल. शारीरिक थकवा जाणवेल. वरिष्ठांशी वाद संभवतात. संतती विषयी काळजी सतावेल.

# हाजीअली येथील हिरापन्ना शॉपिंग सेंटरमध्ये आग, दोन दिवसांत आगीच्या तीन घटना





**मुंबई (यश सावंत) :** मुंबई सेंट्रल येथील हाजीअली परिसरातील सुप्रसिद्ध हिरापन्ना शॉपिंग सेंटरमध्ये रविवारी सकाळी आग लागली. तळमजल्यावरील दोन बंद गाळ्यांमध्ये ही आग लागली आहे. आगीच्या धुराचे लोट रस्त्यावरही येतं असून आग विझवण्याचे काम अग्निशमन दलामार्फत सुरु आहे. गेल्या दोन दिवसात मुंबईत आगीच्या तीन मोठ्या दुर्घटना घडल्या आहेत.

मुंबई सेंट्रलच्या हाजीअली येथील हिरापन्ना या शॉपिंग सेंटरमध्ये रविवारी सकाळी पावणे दहाच्या सुमारास आग लागली. पंडित मदनमोहन मालवीय मार्गावरील हिरापन्ना हे शॉपिंग सेन्टर केवळ तळमजला स्वरूपाचे आहे. मोबाईल, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्त, परफ्युम यांची असंख्य लहानलहान दुकाने या शॉपिंग सेंटरमध्ये आहेत. यातील दोन बंद गाळ्यांमध्ये ही आग लागली होती. गाळ्यांमधून बाहेर येणारा धूर संपूर्ण शॉपिंग सेंटरमध्ये पसरला असून रस्त्यावरूनही हे धुराचे लोट दिसत आहेत. अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल असून आग विझवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. हिरापन्ना हे शॉपिंग सेंट्रल बैठ्या स्वरूपाचे असून आतमध्ये चिंचोळ्या वाटा आहेत. त्यामुळे आग विझवणे हे अग्निशमन दलासाठी मोठे जिकरीचे ठरत आहे.

दरम्यान, गेल्या दोन दिवसात मुंबईत आगीच्या तीन मोठ्या दुर्घटना घडल्या आहेत. शनिवारी मध्यरात्री गोरेगाव येथे जंगलात लागलेली आग रविवारी पहाटे विझली. तर शनिवारी सकाळी कुर्ला येथील भंगार गोदामालाही मोठी आग लागली होती.

# हिमालयातील नदी की इंद्रायणी? वारकऱ्यांच आरोग्य धोक्यात!





**आळंदी (अभिजीत येरल्लू):** आळंदी मध्ये पुन्हा एकदा इंद्रायणी नदी फेसाळली आहे. अवघ्या महाराष्ट्राच श्रद्धास्थान असलेल्या माऊलींच्या आळंदीत इंद्रायणी मध्ये वारकरी पवित्र स्नान करत असतात. परंतु, नदी फेसाळल्यामुळे वारकऱ्यांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. इंद्रायणी नदी ही वारंवार फेसाळते आहे. आज देखील इंद्रायणी नदीत पांढरे शुभ्र मोठ-मोठे बर्फासारखे तुकडे पाण्यावर तरंगत आहेत. गेल्या कित्येक महिन्यापासून आळंदीकर आणि वारकऱ्यांकडून इंद्रायणी नदी स्वच्छ करण्याबाबत आवाहन केलं जात आहे. तसेच काही राजकीय पक्षांनी देखील इंद्रायणी नदी काठावर आंदोलन करून इंद्रायणी प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आणला होता. माजी मुख्यमंत्री तथा सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील इंद्रायणी प्रदूषण मुक्त करण्याचा आश्वासन दिलं होतं. त्यानंतर प्रशासनामार्फत काही पावलं उचलण्यात आली. परंतु, आज पाहिलं तर नदीची अवस्था जैसे थे असल्याचं पाहायला मिळत आहे. खासदार आणि आमदार यावर कुठलाही मुद्दा अधिवेशनात किंवा संसदेत दिसत उपस्थित करत नाहीत. केवळ हिंदुत्वाचा मुद्दा घेऊन आपली महत्वकांक्षा प्राप्त करायची असाच अजेंडा राजकीय नेत्यांचा दिसत आहे.

SPORT

# 'Jasprit Bumrah would've got us out in 3 balls': Lehmann, Vaughan in awe of 'greatest of all time' after MCG classic

**NEW DELHI :** Jasprit Bumrah was in sensational form on the fourth day of the fourth Test at the MCG, leading India's charge with a spell that had Australia in a complete daze. After Tea, with Australia teetering at 135/6, Bumrah (4/30 in 14 overs) delivered a breathtaking spell that gave India their first real chance of victory.

Australia had a healthy first-innings lead of 105 runs, but Bumrah's unplayable lengths, awkward bounce, and late swing kept the hosts on edge. The Indian vice-captain, who reached 200 Test wickets with the dismissal of Travis Head, was in full control, leaving the Australian batters scrambling for survival.

Former cricketers, Michael Vaughan and Daren Lehmann, were in awe of Bumrah's brilliant spell in the second innings. Vaughan labelled Bumrah the 'greatest of all time', while Lehmann claimed the Indian pacer would've dismissed him 'twice' in three balls.




"The Greatest of all time is doing what he does best here at the 'G' .. @Jaspritbumrah93 is incredible .. #AUSvIND," Vaughan wrote.

In reply, Lehmann said, "How good is he . Brilliant would have got us out in three balls and it's only three balls because he would have got me twice and one a no ball."

Bumrah's brilliance was amplified by the support from the other end, something India had sorely missed since the Perth Test. Mohammed Siraj triggered the Aussie collapse with the dismissal of Steve Smith; thereafter, in a stunning 10-over period, Australia lost three key wickets, all of which were down to Bumrah's relentless pressure and accurate line.

Marnus Labuschagne (65* off 118 balls) fought valiantly, but he was fortunate to survive a catch opportunity off Akash Deep. The Australian middle order was under constant threat, and India's bowlers sensed an opening as the hosts' advantage continued to shrink.

With Bumrah firing on all cylinders, Australia's once-comfortable position looked increasingly vulnerable, setting the stage for an exciting final stretch in the Boxing Day Test match.

# Not Just Nitish Kumar Reddy! Sachin Tendulkar Also Praises 25-Year-Old Star For Heroics In Boxing Day Test






**NEW DELHI :** Nitish Kumar Reddy stole the show on Day 3 of the 4th Test between India and Australia at the iconic Melbourne Cricket Ground (MCG). He slammed the Australian bowlers all over the park as he scored his maiden Test century. Hitting one of the most iconic knocks by an Indian on Australian soil, Nitish Reddy received praise from many stalwarts in he cricketing world. He has now received the highest praise from the legendary Sachin Tendulkar as well.

In a post on his X account, Sachin Tendulkar said that it was a knock to remember by Nitish Reddy. He revealed that the 21-year-old all-rounder impressed him right from the first Test at Perth because of his composure and temperament. He also praised Washington Sundar, who slammed a half-century himself and stitched a 127-run stand with Nitish Kumar Reddy for the 8th wicket.

"A knock to remember by Nitish. He has impressed me right from the 1st Test, and his composure and temperament have been on display right through. Today, he took it a notch higher to play a crucial innings in this series. Wonderfully and ably supaported by @Sundarwashi5 as well. " Well played," Tendulkar wrote.

Nitish Kumar Reddy becomes just the second Indian to slam his maiden Test century at the iconic Melbourne Cricket Ground. The first Indian to do so was the legendary Vinoo Mankad, who hit a ton way back in 1948. Reddy is also the first player since JP Duminy in 2008 to slam his maiden century at the iconic ground.

At 21 years 141 days, Nitish Reddy also becomes the third youngest player from India to slam a Test Century in Australia. Sachin Tendulkar (18 years 253 days) and Rishabh Pant (21 years 91 days) are the players who are ahead of Reddy in the list.

Nitish Kumar Reddy also becomes the first Indian batter at no.8 to slam a century in Australia. The previous highest individual score by an Indian no.8 batter Down Under was held by Anil Kumble, who scored 87 in 2014.

# 'I can go strong for years to come': Novak Djokovic targets more tournaments in 2025

**NEW DELHI :** Novak Djokovic aims for more tournament wins and a higher ranking in 2025. He spoke in Brisbane, Australia, before the Brisbane International tournament this week. Djokovic, currently ranked seventh, wants to improve his consistency.

"I'm looking for a good start to the season, I'm looking for more consistency across all the tournaments," he stated. He plans to play more tournaments than last year and hopes his performance will improve. "I'm looking to play more tournaments this year than I played last season, so hopefully also my level is going to go up. Hopefully I will win



a few more tournaments and my ranking will go up to where it should be."

The 37-year-old won Olympic gold in Paris last year but didn't win a Grand Slam, a rare occurrence for him. He's beginning this season without long-time rivals Rafael Nadal, Andy Murray, and Roger Federer, who have all retired. Jannik Sinner and Carlos Alcaraz have become prominent Grand Slam contenders.

He will turn 38 in May next year, but Djokovic has no plans to retire. He seeks his 11th Australian Open title and a record 25th Grand Slam victory next month. "The way I'm feeling today, I still think that I can go strong for years to come," he said, though acknowledging uncertainty about his future motivation. "But how long I'm going to feel motivated to keep going is unpredictable. I still love this sport and I still love competing."

# 'That's why you're not head coach': Australian legends in heated debate over Rishabh Pant's dismissal

**NEW DELHI :** Rishabh Pant's dismissal on the third day of the Boxing Day Test at the MCG sparked a heated debate between two Australian legends over his shot selection.

Pant tried to scoop Scott Boland to fine leg but ended up edging the ball, which was easily caught by Nathan Lyon at deep third man.

"That's unacceptable. I know he's a very aggressive player and a player that is a bit out of the box and unpredictable but you've got to read the game situation and read the field. There were two men back for that exact shot so the percentages are not in your favour, unless you hit it for six you're going to be caught



somewhere in the deep," Mark Waugh said on Fox Cricket.

"It's just too hard of a shot and too risky of a shot to play with any degree of confidence and I'd be pulling him into line saying you didn't need to do that. If you're going to be attacking, run at the bowler and hit him over mid-off, I'd much rather that shot than that shot," he added.

However, Waugh's comment did not sit well with his compatriot Michael Hussey, who defended Pant on the panel, stating that the wicketkeeper-batter thrives on playing audacious, unconventional shots.

"It's a hard one though isn't it because that's the way he likes to play, he likes to play these crazy shots and if you start putting too much doubt in his mind then it might just confuse him more. It is a poor shot, don't get me wrong," he said.

England legend Michael Vaughan, who was also part of the panel, backed Hussey's remark.

"Rishabh Pant is an exceptional talent, he plays in a way that not many play the game, wouldn't you give him the licence to keep on playing in that fashion?"

"No, because that's not an excuse," Waugh remained defiant in his criticism of Pant.

"That's an awful shot when his team needed him to make an innings. I get it he's an aggressive player and I want to see him be aggressive but you've still got to have some boundaries with the shots you play. There's got to be a level of restraint and percentages in your favour and that shot falling down."

Hussey argued that if Pant had cleared the boundary with a six, Waugh would have praised him in the commentary box. He added that he wouldn't want Pant to alter his natural playing style. However, the debate didn't end there, as Waugh had the final word, challenging Hussey with, "So you're saying that's okay, as a coach?"

"Yep, I'd say go for it mate, do what you want to do," Hussey replied.

"That's why you're not the head coach, just the assistant coach," Waugh quipped, prompting laughter from both Hussey and Vaughan.

# दक्षिण कोरियातील भीषण अपघातात १७९ प्रवासी ठार

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

दक्षिण कोरियातील मुआन विमानतळावर मोठी दुर्घटना घडली आहे. बँकॉकमधून प्रवाशांना घेऊन आलेले विमान लँडिंग होताना अपघात झाला. यावेळी विमानाला लागलेल्या भीषण आगीत १७९ प्रवाशांचा मृत्यू झाला.

धावपट्टीवरून जाऊन विमान भिंतीवर आदळल्यानंतर विमानानं पेट घेतला. दोन प्रवासी वगळता सर्व जण म्हणजे १७९ प्रवासी ठार झाल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितले. हा अपघात स्थानिक वेळेनुसार सकाळी ९:०७ वाजता घडला. अपघातात दोन महिला वाचल्या आहेत. त्यामध्ये एक प्रवासी आणि एक क्रू मेंबर आहे. त्यांच्यावर मोक्पो येथील रुग्णालयात



उपचार सुरू आहेत.

बँकॉकहून परतणाऱ्या विमानात सहा क्रू मेंबर्ससह एकूण १८१ प्रवासी होते. दोन थायलंडचे नागरिक वगळता बहुतांश प्रवासी कोरियन नागरिक होते.स्थानिक टीव्ही स्थानकांद्वारे प्रसारित केलेल्या व्हिडिओमध्ये विमान लँडिंग गियरवर उतरताना जमिनीवर घसरल्याचे दिसते. स्फोट होण्यापूर्वी विमान काँक्रीटच्या भिंतीवर आदळले. त्यानंतर भीषण आगीत संपूर्णपणे भस्मसात झाले. लँडिंग गियरमध्ये बिघाड आणि शक्यतो पक्ष्यांच्या धडकेमुळे हा विमान अपघात झाला असावा. नेमके कारण शोधण्यासाठी घटनास्थळी चौकशी सुरू आहे.

थायलंडचे पंतप्रधान, पेटोंगटार्न शिनावात्रा यांनी एक्स मीडियावर पोस्ट करत पोस्टद्वारे अपघातात मृत्यू झालेल्या कुटुंबीयांबद्दल तीव्र शोक व्यक्त केला. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाला त्वरित मदत करण्याचे आदेश दिल्यांनी एक्स मीडियातील पोस्टमध्ये म्हटले आहे. विमान अपघातामधील मृतांची संख्या वाढून ८५ झाल्याचं स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितलं. दक्षिण कोरियातील हा आजपर्यंतचा सर्वात भीषण विमान अपघात आहे. मृतामध्ये ३७ महिला आणि २५ पुरुष आहेत. नॅशनल फायर एजन्सीने सांगितलं की, विमानाची आग जवळजवळ आटोक्यात आली आहे. परंतु अधिकारी अजूनही जेजू एअर प्रवासी विमानातून लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहेत. आग आटोक्यात आणण्यासाठी ३२ फायर ट्रक आणि अनेक हेलिकॉप्टर तैनात करण्यात आले आहेत.

दक्षिण कोरियाच्या आपत्कालीन कार्यालयाच्या माहितीनुसार विमानतळावरील आग विझवण्यात आली. दक्षिण कोरियाच्या मुआन शहरातील विमानतळावरील जेजू एअर पॅसेंजर विमानाला लँडिंग होताना अचानक आग लागली. या दुर्घटनेतील काही प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं आहे. हे विमान सुमारे १८१ लोकांसह बँकॉकहून परतत होते. दक्षिण कोरियाच्या आपत्कालीन कार्यालय आणि स्थानिक माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, लँडिंग गियरमध्ये बिघाड असल्यानं विमान धावपट्टीवरून घसरून कुंपणाला धडकले. त्यामुळे विमानतळावर रविवारी विमानाला आग लागली. स्थानिक टीव्ही माध्यमांनी विमान दुर्घटनेचे व्हिडिओ प्रसारित केले आहे. यात विमान लँडिंग होताना विमानाला भीषण आग लागल्याचं दिसून येते.

# तिसरीही मुलगी झाल्यानं पतीनं पत्नीला जाळलं

● परभणी, दिगंबर जाधव:



मुलगा हवा असलेल्या पतीनं बायकोला तिन्ही मुलीच झाल्यानं या नाराजीतून पत्नीला जिवंत जाळल्याची घटना या पुरोगामी महाराष्ट्रातील परभणी शहरात घडली. मृत महिलेच्या बहिणीनं दिलेल्या तक्रारीनंतर, नराधम पती विरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार बहीण आणि मृत महिला या शेजारीच राहतात. आपल्याला मुलगा का होत नाही, तिन्ही मुली कशा झाल्या म्हणून महिलेचा नवरा तिचा सतत शारीरिक आणि मानसिक छळ करत होता. त्यांचं भांडण अनेकदा तक्रारदार बहिणीने सोडवलं होतं. गुरुवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास मृत महिला ओरडत घराबाहेरील रस्त्यावर आल्यानं तक्रारदार बहिणीनं घराबाहेर येऊन पहिलं असता, पेटलेल्या अवस्थेत त्यांना त्यांची बहीण दिसली. त्यावेळी ती एका दुकानामध्ये शिरली आणि मला वाचवा म्हणून पळत होती, असं त्यांनी सांगितलं. त्यानंतर मृत महिलेचा पती तेथून पळून जाताना दिसल्याचा दावा त्यांच्या बहिणीनं केला. गंभीर जखमी झालेल्या माहिलेला त्वरित सरकारी दवाखान्यात उपचारासाठी नेलं असता शुक्रवारी तिचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

"या घटनेनंतर पोलिसांनी तातडीनं आरोपी पतीचा तपास सुरू केला. मध्यरात्री पतीला अटक करण्यात पोलिसांना यश आलं आहे. आरोपीला न्यायालयात हजर केलं असता, त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे," अशी माहिती पोलीस निरीक्षक संजय ननवरे यांनी दिली. या घटनेन राज्यात एकच खळबळ उडाली आहे. आधुनिक जगात मुलगी नको मुलगाच हवा अशी राक्षसी वृत्ती जिवंत असल्याचं या पुरोगामी महाराष्ट्रात बघायला मिळत असल्यानं नागरिक संताप व्यक्त करत आहेत.

# अल्पवयीन मुलीला बोटीवर नेऊन अत्याचार; रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल




● अलिबाग, दिगंबर जाधव :

अल्पवयीन मुलीला बोटीवर नेऊन तीच्यावर अत्याचार केल्याची घटना मुरुड तालुक्यात समोर आली आहे. या प्रकरणी २२ वर्षीय तरूणाविरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सात वर्षांची ही अल्पवयीन मुलगी तिच्या बहिण भावासह प्रातः विधीसाठी समुद्र किनारी गेली होती. यावेळी आरोपी तेथे आला, तिला फूस लावून बहिण भावांपासून दूर घेऊन गेला. नंतर तिला किनाऱ्यावर लागलेल्या एका बोटीत नेले. तिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केले.या घटनेचा मुलीला जबर धक्का बसला. शारीरिक वेदनाही जाणवू लागल्या. त्यामुळे पिडीत मुलीने याबाबतची माहीती तिच्या आईला दिली. आईने तात्काळ पोलीस ठाणे गाठून या संदर्भातील तक्रार नोंदवली. या मुलीच्या पालकांनी दिलेल्या तक्रारीनंतर आरोपी आर्यन दिपक कोटकर विरोधात भारतीय न्याय संहीता आणि पॉस्को कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ई- रिक्षाच्या संख्येत ताबडतोब वाढ करावी पर्यटकांची मागणी

● माथेरान, विशाल पाटील :

नाताळ आणि नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांनी माथेरानला पसंती दिली आहे. परंतु वाहतुकीच्या गहन समस्यांना सामोरे जात प्रवास करावा लागत असल्यामुळे लवाजम्यासह आलेल्या पर्यटकांची त्रेधातिरपीट उडत आहे.ई रिक्षाची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे कधी नव्हे एवढी पर्यटकांची गर्दी याठिकाणी पाहावयास मिळत आहे. ई रिक्षाच्या स्टँडवर अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने रहदारीला कोणत्याही प्रकारचा अडथळा



निर्माण न करता कोणत्याही बंदोबस्ताशिवाय ई रिक्षा संघटना उत्तम प्रकारे सेवा देत आहेत. विशेष म्हणजे या ई रिक्षाच्या स्वस्त आणि सुरक्षित सेवेचा लाभ घेण्यासाठी पर्यटक सुध्दा आपला अमूल्य वेळ खर्च करून ताटकळत उभे राहून चांगल्या पद्धतीने प्रतिसाद देत आहेत. या सेवेचा पायलट प्रोजेक्ट पूर्ण झाला असून फक्त वीस रिक्षांच्या माध्यमातून सेवा उपलब्ध करून देणे चालकांना त्रासदायक बनले आहे. संघटनेची त्यांच्या हक्काची उर्वरीत एकूण ७४ बाकी असलेल्या ई रिक्षांची मागणी आहे. या सर्व रिक्षा उपलब्ध झाल्यास सर्वांना प्रवास सुखकर होणार असून यापुढेही इथे मोठया प्रमाणावर पर्यटन क्रांती घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. शासनाने आणि संबंधित समितीच्या अधिकाऱ्यांनी लवकरच ई रिक्षांच्या संख्येत वाढ करणे गरजेचे आहे.शाळेच्या दिवसात शालेय विद्यार्थ्यांना वीस पैकी पंधरा रिक्षा सेवा देत असतात तर उर्वरित पाच रिक्षा प्रवाशांना अपुऱ्या पडतात.

**निरंजन हातनोलकर-पर्यटक मुंबई**

गर्दीच्या वेळी पर्यटकांना ई रिक्षाच्या रांगेचे नियोजन मी निस्वार्थीपणे करीत असतो. ई रिक्षाची संख्या कमी असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिलांना तासनतास ई रिक्षाची वाट पहावी लागते यासाठी सनियंत्रण समितीने ई रिक्षाची संख्या वाढवावी. पायलट प्रोजेक्टचा कालावधी पूर्ण झाला आहे.

जनार्दन पार्टे-सामाजिक कार्यकर्ते,माथेरान

# प्राजक्ता माळी यावर बोलणार नाही, कल्याण-बदलापूर घटनेवर फिल्म इंडस्ट्रीतलं कोणीच बोललं नाही - वडेट्टीवार संतापले

● मुंबई, यश सावंत :

बीडमधील संतोष देशमुख हत्याकांडावरुन राज्यभर संताप व्यक्त होत असताना राजकीय नेत्यांनी देखील हे प्रकरण हाती घेतलं आहे. राज्य सरकारची भूमिका संशयास्पद असून आपल्या मंत्रिमंडळातील मंत्र्याची पाठराखण केली जात असल्याचा आरोपही विरोधकांकडून होत आहे. त्यातच, आमदार सुरेश धस यांनी परळीचा सांस्कृतिक पॅटर्न म्हणत अभिनेत्री प्राजक्ता माळीचं नाव घेतल्यानंतर या प्रकरणाला वेगळंच वळण लागलं आहे.



कारण, प्राजक्ता माळीने पत्रकार परिषद घेऊन महिलांना बदनाम केलं जात असल्याचं म्हटलंय. आता, याप्रकरणी काँग्रेस नेते व आमदार विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकारला लक्ष्य केलं. तसेच, बीडप्रकरणी वाल्मिक कराडची नार्को टेस्ट करावी आणि धनंजय मुंडेंचा तत्काळ राजीनामा घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी, प्राजक्ता माळी यांनीही ह्या हत्याकांड प्रकरणावर बोललं पाहिजे, सिनेकलाकार अशा घटनांवर बोलत नाही. कल्याणच्या घटनेवर, बदलापूरच्या घटनेवर कोणी बोलताना दिसलं नाही, असे म्हणत सिनेकलाकारांकडे बोट दाखवलं आहे. आम्ही कुणाला सोडणार नाही, पण आम्ही कोणाला पकडणार देखील नाही, असे म्हणत काँग्रेस नेते व आमदार विजय वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच, फरार आरोपींची संपत्ती जप्त केली जात आहे, पण हा दिखावापणा आहे कारण ती संपत्ती अवैध मार्गानेच कमावलेली आहे. ज्या गतीने कारवाई व्हायला पाहिजे, त्या गतीने कारवाई होत नाही, याउलट हे प्रकरण दाबलं जात आहे.

# यमुना स्वच्छतेच्या प्रश्नावरून केजरीवालांचा नवा कावेबाज डाव!

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

दिल्ली विधानसभेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाच्या अरविंद केजरीवालांनी नवीन डाव टाकायाला सुरूवात केली आहे. माध्यमांशी बोलताना केजरीवाल म्हणाले की लोकांनी मला मतदान केले नाही, तरी सुद्धा मी यमुना नदी स्वच्छ करणार आहे असे केजरीवाल म्हणाले. मी राजकारणात केवळ मतपेटीच्या राजकारणासाठी आलो नसून,आता कुठे मला राजकारण कळायाला लागले आहे. असे प्रतिपादन केजरीवाल यांनी केले



आहे.वास्तविक केजरीवाल यांना बहुदा या गोष्टीचा विसर पडला असावा की १० वर्षांपूर्वी सत्तेत येण्यासाठी त्यांनी यमुना स्वच्छ करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु त्यांनी ते पाळले नाही. २०१९ साली केजरीवाल सरकारने यमुना नदी पुढच्या ५ ते ६ वर्षात स्वच्छ केली जाईल असे आश्वासन दिले होते. त्याच डिसेंबर महिन्यात केजरीवाल यांनी वचन दिले की २०२५ पर्यंत ते सबंध गाव पवित्र आणि स्वच्छ अशा यमुना नदीत आंघोळ करू शकेल. परंतु केजरीवाल यांनी केलेल्या सर्व आश्वासनांवर अक्षरशा: पाणी फिरले आहे. माध्यमांना मिळालेल्या माहितीनुसार अरविंद केजरीवाल यांच्या दिल्ली सरकारने यमुनेच्या स्वच्छतेसाठी तब्बल ६, ८५६ कोटी रूपये खर्च केले होते. दुसऱ्या बाजूला २०२३ - २४च्या अर्थसंकल्पामध्ये दिल्ली सरकारने १,०२८ कोटी रूपयांची तरतूद यमुनेच्या स्वच्छतेसाठी केली गेली होती. यमुना नदी स्वच्छ झाली नाहीच, मग इतक्या सगळ्या पैशांचे काय झाले असा प्रश्न आता विचारला जातोय.


# पंजाबराव देशमुखांनी शिक्षणसंस्थेकरिता गहाण ठेवलेला वाडा होणार स्मृतिस्थळ

● अमरावती , राकेश गायकवाड :

महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मालकीचा असणारा वाडा आता डॉ. पंजाबराव देशमुख याचं स्मृतिस्थळ होणार आहे. त्यासाठी बँकेच्या वतीनेच पुढाकार घेतला जातोय. एकूणच शिक्षण महर्षीचा डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२६व्या जयंती पर्वावर त्यांचा हा वाडा आणि भाऊसाहेबांच्या स्मृतींना उजाळा देणारा'ईटीव्ही भारत' चा हा स्पेशल रिपोर्ट.

माजी कृषिमंत्री तथा शिक्षणमहर्षी अशी ओळख असणारे डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा अमरावती शहरात मालटेकडीलगत टोपे नगर परिसरात असणारा वाडा स्मृतीस्थळ करण्याकरिता काम सुरू आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी दी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव बँकेकडे वाडा गहाण ठेवला होता. पुढे त्यांच्या पत्नी विमलाबाई देशमुख यांनी अडचणीच्या काळात बँकेलाच वाडा विकला. दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेनं काही वर्ष या इमारतीत बँक चालवली. बँकेसाठी नवी इमारत उभारण्यात आली आहे. त्यामुळे भाऊसाहेबांचा वाडा जपण्याचा प्रयत्न बँकेच्या वतीनं करण्यात येत आहे.

देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणमंत्री असणारे डॉ. पंजाबराव देशमुख हे देश स्वतंत्र झाल्यावर देशाचे पहिले कृषिमंत्री झाले. १९५८ ते ५९ दरम्यान डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अमरावती शहरात सुमारे 33 हजार स्क्वेअर फुट जागा खरेदी करून त्या ठिकाणी दोन मजली वाडा बांधला. वाड्याच्या खालच्या मजल्यावर मोठी बैठक खोली, तीन शयन कक्षांसह छानशी स्वयंपाक खोली आणि टुमदार गॅलरी बांधली. वरच्या मजल्यावरचं बांधकामदेखील



खालच्या मजल्याप्रमाणेच आहे. वरच्या मजल्यावरची बैठक खोली ऐसपैस बांधली. पूर्वी या वाड्यातून थेट मालटेकडी आणि मालटेकडी खालचा रस्ता दिसायचा. यासोबतच अमरावती मध्यवर्ती बस स्थानक आणि थेट आजचा गर्ल्स हायस्कूल चौक दिसायचा.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेअंतर्गत विदर्भातील अनेक शाळा महाविद्यालय सुरळीत सुरू राहावेत या उद्देशानं आपला हा राहता वाडा दि.महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेकडे गहाण ठेवला. १० एप्रिल १९६५ ला डॉ. पंजाबराव देशमुख यांचं निधन झालं. यानंतर या वाड्यात राहणाऱ्या त्यांच्या पत्नी विमलाबाई देशमुख यांना आर्थिक चणचण भासत होती. त्यांनी बँकेकडे गहाण असणारा हा वाडा बँकेलाच विकला. त्यावेळी बँकेचे अध्यक्ष देविदास बोबडे आणि माजी खासदार उषा चौधरी यांनी हा वाडा खरेदी करताना एक करार केला. "हा वाडा कधीही जमीनदोस्त केला जाणार नाही. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे स्मृतीस्थळ म्हणून इमारत कायम जपली जाईल, असा हा करार होता," अशी माहिती बँकेचे व्यवस्थापक किशोर राऊत यांनी ईटीव्ही भारतशी बोलताना दिली. या इमारतीसमोर बँकेच्या वतीनं डॉ. पंजाबराव देशमुख यांचा पुतळा उभारला. भाऊसाहेबांच्या जयंती निमित्त या ठिकाणी दरवर्षी सजावट करून कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

"साधारण ७५ ते ८० वर्षांपूर्वी डॉ. पंजाबराव देशमुख यांनी ही वास्तू उभारली असं लक्षात येतं. कृषिमंत्री या नात्यानं भाऊसाहेब याच ठिकाणी राहायचे. कृषिमंत्री म्हणून भाऊसाहेबांनी याच इमारतीतमधून विधायक निर्णय घेतले. त्यामुळे ही वास्तू अबाधित-सुरक्षित राहावी. भाऊसाहेबांचं स्मारक या ठिकाणी व्हावं," अशी भावना प्रा.डॉ.वैभव मस्के यांनी व्यक्त केली.

■ कृषी शिक्षणासाठी भाऊसाहेबांसारख्या महान व्यक्तींनं मोठे योगदान दिलं. या महान व्यक्तीच्या स्मृती या वाड्यात जपले आहेत. भाऊसाहेबांच्या स्मृती कायम राहाव्यात समाजासाठी ज्याप्रमाणे भाऊसाहेबांनी कार्य केलं. अगदी तसंच कार्य या इमारतीतून आता पुढे व्हावं यासाठी आमचे प्रयत्न आहेत-प्रा. मनीष पाटील

■ भाऊसाहेबांच्या कार्याचा संक्षिप्त आढावा- डॉ. पंजाबराव देशमुख यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेची १९३२ मध्ये स्थापना केली. या संस्थेतून त्यांनी विदर्भातील सर्वसामान्यांना शिक्षणाची कवाडं खुली केली. १९३७ ला बटलर यांच्या मंत्रिमंडळात भाऊसाहेब शिक्षण मंत्री असताना जातीय निवारणासह कुसुमावती देशपांडे यांना केवळ त्या महिला असल्यामुळे प्राध्यापक म्हणून नाकारणे या विरोधात महत्त्वाची भूमिका बजाविली. डॉ. व्ही. बी. कोलते यांना जातीच्या आधारावर डावललं गेल्यामुळे त्यांच्यासाठी राजीनामा देण्याची तयारी भाऊसाहेबांनी दाखवली. पुढे भविष्यात डॉ. व्ही. बी. कोलते हे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू झाले. भाऊसाहेब शिक्षण क्षेत्रातच नव्हे तर राजकारण, समाजकारणात सक्रिय होते. जातीय निवारण तसेच अस्पृश्यता निवारणात त्यांनी भरीव योगदान दिलं. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या खांद्याला खांदा लावून संविधान निर्मितीत भाऊसाहेबांनी मोठं योगदान दिलं. १९५२ मध्ये देशाचे पहिले कृषिमंत्री झाल्यावर हरितक्रांतीचे त्यांनी प्रयोग केलेत. या दृष्टीनं भाऊसाहेबांचे कार्य फार मोठं होतं", असं 'युगपुरुष डॉ. पंजाबराव देशमुख' या पुस्तकाचे लेखक प्रा. डॉ. वैभव मस्के यांनी "ईटीव्ही भारत" शी बोलताना सांगितलं.